॥ ॐ । श्री ।卐 ॥

# विश्वपंढरी

वारी साधनेतून साध्याकडे....

## जय श्री

# राम

वर्ष १९ वे । अंक ०४ था । ०१ एप्रिल २०२५ । पाने ८० । वार्षिक मूल्य रु.३००/-

Postal Regn. No - KLR-260 / 2023-25
R.N.I. Regn No.MAHMAR / 2007 / 21003
PUBLICATION DATE: 1-3 Every Month
POSTING DATE : 5 th Of Every Month
Office Of Posting : R.M.S.; Kolhapur
Weight : 80-150 gm

# Sanchomee Herboveda Pvt. Ltd.

Traded as "मनकर्णिका औषधालय"

## संचोमी हर्बोवेदा - उत्पादनांची विश्वसनीय गुणवत्ता !

### Tyromee Tablet

थायरोमी टॅबलेट

**Thyromee Tablet supports thyroid hormone balance, boosts metabolism, aids detoxification and improves overall digestion.**

Ingredients :

Kanchnar Guggulu, Jahar Mohra Pishti, Praval Panchamrit Sada, Triphala, Trikatu, Extracts of Kanchnar, Processed in Varun Chhal, Punarnava, Dashmul, Hamsapadiadi Kashayam, Vasa Panchang, Neem Panchang, Hamsapaadi, Peepali, Guduchi, Excipients.

2 tabs twice a day with water after meal or as advised by the physician.

60 Tab & 500 Tab




### Ojaditya Tablet

ओजआदित्य टॅबलेट

**Ojaditya Tablet is helpful in supporting immunity, managing stress & promoting overall wellness with the goodness of Ayurvedic herbs.**

Ingredients :

Shiva Gutika, Powders of Ashwagandha, Shatavari, Musli, Amalki Rasayana, Gokharu, Giloy, Trikatu, Triphala, Dalchini, Nagkeshar, Tejpaan, Laung, Keshar, Excipients.

2 tabs twice a day with water after meal or as advised by the physician.

60 Tab & 500 Tab




### Roopkesha Tablet

रूपकेशा टॅबलेट

**Roopkesha Tablet is helpful in nourishing the scalp, strengthening hair roots, reducing hair fall & supporting healthy, natural hair growth.**

Ingredients :

Bhringraj Ghana, Triphala Ghana, Brahmi Ghana, Mulethi Ghana, Swarna Makshik Bhasma, Powders of Krushna till, Praval Panchamrit Sada, Amalki Rasayana, Majith, Processed in Guduchi, Ashwagandha, Ambadi phul, Excipients.

2 tabs twice a day with water after meal or as advised by the physician.

60 Tab & 500 Tab




### Citrunalia सीट्रूनालिया

150 gm

**Citrunalia improves blood circulation, boosts endurance and reduces fatigue, making it ideal for winter wellness.**

Ingredients :

l-citrulline, Beet powder, Partially hydrolyzed Guar gum, Pomegranate fruit powder, Arjun ext., Gokharu ext., Methi ext., Ashwagandha ext., Cinnamon powder, Maltodextrin, Rock salt.

10 gm once a day.




आम्ही प्रभावी, प्रतिबंधात्मक, पौष्टिक आणि उपचारात्मक आयुर्वेदिक व हर्बल उपाय पुरवतो, जे वैद्यकीय तज्ञांना त्यांची उपचार क्षमता आणि प्रतिष्ठा वाढविण्यात मदत करतील.

**Sanchomee Herboveda Pvt. Ltd.**
*Chinchwad, Pune*
Phn No. : 9011095938 /9011001633/ (020)24493953.

**Vanashree Ayurved Aushadhalaya**
*Paud road, Pune*
Ph. No. 8888891673

WhatsApp Order 8805498484 Email : sanchomeeherboveda@gmail.com Visit us at : www.sanchomee.com




# विश्वपंढरी

*वारी साधनेतून साध्याकडे..*

*** वर्ष १८ वे * अंक ०४ था * ०१ एप्रिल २०२५ ***


# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ०१) मनोगत | श्री. प्रदीप कुलकर्णी. | ०४ |
| ०२) मुहूर्त | | |
| ०३) सेवा प्रतिष्ठान कार्य तपशील | | ०७ |
| ०४) ट्रस्ट कार्य तपशील | | १९ |
| ०५) श्री विश्ववती कार्य तपशील | | २५ |
| ०६) सेवाभावी आयुर्वेद शिबीर | | ५७ |
| ०७) योग अनुभव | | ७२ |



■ संपादक : श्री.प्रदीप कुलकर्णी मो.क्र. +९१ ७५०६६ ६२७८७

■ कार्यकारी संपादक : श्री.शेखर देशपांडे. मो.क्र. +९१ ९९६०७ १९३८६

■ वर्गणी प्रकार : ■ वार्षिक वर्गणी : ३००/- रु. ■ त्रैवार्षिक : ८५०/-

■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील मतांशी व मजकूराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

■ पत्रव्यवहाराचा पत्ता- 'विश्वपंढरी', ६९७, श्री विश्वनाथ महाराज रुकडीकर मार्ग, मंगळवार पेठ, कोल्हापूर. ४१६०१२

■ अंकाबाबतीत सर्व गोष्टींसाठी संपर्क: श्री विश्वपंढरी कार्यालय - ८२ ७५ ४५० ६५०/७३ ५० ६८३ ६३६

■ कार्यालय संपर्क - ०२३१-२६२००४४ ■ E-Mail ID - vishwapandharimagazine@gmail.com





# || मनोगत ||

सप्रेम नमस्कार,

श्रीमन्नृप शालिवाहन शक १९४७ ''विश्वावसु'' नाम संवत्सर नुकतेच सुरु झाले आहे. सर्वांना हे नववर्ष सुख, समृद्धी आणि आरोग्यदायी जावो, ही सद्‌गुरुचरणी प्रार्थना!

श्री सद्‌गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट हा मूळ अध्यात्मिक कार्यासंदर्भात स्थापन झाला. परंतु 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे' या उक्तीनुसार समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी इतर सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय कार्येसुद्धा ट्रस्टशी संलग्न श्री सद्‌गुरु दादामहाराज सांगवडेकर प्रतिष्ठान, श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकीत्सालय व रिसर्च सेंटर आणि विश्वपंढरी सोशल फौंडेशन या संस्थांमार्फत केली जातात. संपूर्ण वर्षभर चालणाऱ्या निरंतर सेवाकार्याचा वार्षिक अहवाल एप्रिलच्या या अंकाद्वारे सादर करीत आहोत.

तसेच प्राजक्ता सांगवडेकर यांच्याद्वारे घेतलेल्या योगशिक्षणाला उदंड आणि प्रभावी प्रतिसाद मिळत आहे. त्यासंबंधीचे काही साधकांचे अनुभव अंकात सामील केले आहेत.

ट्रस्टतर्फे चालू असलेल्या सर्व निरंतर कार्यांना वाचकांचासुद्धा सक्रीय सहभाग लाभावा, ही अपेक्षा !

आपला नम्र

॥ सुभाषित ॥

**भीतेभ्यश्चाभयः देयः व्याधितेभ्यस्तदौषधम् ।**
**देया विद्यार्थिने विद्या देयमन्नं क्षुधातुरे ॥**

घाबरलेल्याला आसरा (धीर) द्यावा, आजाऱ्याला औषध द्यावे, जिज्ञासूला ज्ञान द्यावे आणि भूकेल्याला अन्न द्यावे.

## • एप्रिल २०२५ महिन्यातील शुभ मुहूर्त •

**उत्तम मुहूर्त**
१,३,४,५,६,७,९,१०,११,१२,१४,१६,१७,
१८,२०,२१,२२,२३,२४,२५,२८, ३०,

**वाहन खरेदी व दवाखाना सुरु करण्यास**
१,३,४,५,६,७,९,१०,११,१२,१४,१६,१७,
१८,२०,२१,२२,२३,२४,२५,२८,३०.

**शस्त्रक्रिया**
३,४,५,७,१०,१२,१४,१६,१७,२०,
२१,२२,२३,२४,२५,२८,३०.

**भूमिपूजन व पायाभरणी मुहूर्त**
**या महिन्यात मुहूर्त नाहीत**

## • मे २०२५ महिन्यातील शुभ मुहूर्त •

**उत्तम मुहूर्त**
१,२,३,४,६,८,९,१०,११,१२,१३,१४,
१६,१७,२०,२३,२४,२८,२९,३०,३१.

**वाहन खरेदी व दवाखाना सुरु करण्यास**
१,२,३,४,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,
१६,१७,२०,२३,२४,२८,२९,३०,३१.

**शस्त्रक्रिया**
३,४,५,७,१०,१२,१४,१६,१७,२०,
२१,२२,२३,२४,२५,२८,३०.

**भूमिपूजन व पायाभरणी मुहूर्त**
१,५,७,१७,२२.



श्री सद्‌गुरु दादा तथा माधवनाथ महाराज

अखंड अनुसंधानाने भक्तीत वाढ होते. जवळ असूनही अधिकाधिक जवळ असावे अशी अनुभूती येते व त्यातच अखंड रमावे वाटते. मगच संसाराची काळजी सद्‌गुरू घेतात. साधकाला प्रेमात डुंबण्याचा आनंद सद्‌गुरू घेऊ देतात.

# श्री सद्‌गुरु दादा महाराज
# सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

१७/०४/२०२४

श्री भवानी देवी उत्पती दिनानिमित्त श्री विश्वपंढरी येथे सामुदायिक कुंकुमार्चन सेवा संपन्न झाली. सांगवडेकर कुटुंबीयासहीत साधक-भक्त उपस्थित होते.

२३/०४/२०२४

विश्वपंढरी मध्ये श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. तत्पूर्वी पहाटे ५.३० वा श्री आनंदनाथ महाराज यांचे हस्ते अभिषेक व पूजा संपन्न झाली. यानंतर श्री हनुमान जन्मकाळ संपन्न झाला. यावेळी नित्य सेवेकरी व इतर साधक उपस्थित होते.

२७/०४/२०२४

विश्वपंढरी येथे श्री सद्‌गुरु दादा तथा माधवनाथ महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त २८/०४/२०२४ ते ३०/०४/२०२४ अशा तीन दिवसीय ध्यान साधना शिबीराची सुरवात कलश स्थापना करुन झाली.

या ३ दिवसात सकाळच्या सत्रात पहाटेपासून दुपारपर्यंत ४ वेळा ध्यान साधना, तीन वेळा जपसाधना दुपारी भोजन व विश्रांती सायंकालीन सत्रात ३ वेळा ध्यान साधना व २ वेळा जपसाधना त्यानंतर आरती , भोजन व विश्रांती असे स्वरुप होते.

२६/०६/२०२४

दरवर्षीप्रमाणे श्री ज्ञानेश्वर माऊली यांच्या पालखी आगमना निमित्त, श्री सद्‌गुरु विश्वनाथ महाराज रूकडीकर ट्रस्ट तर्फे श्री ज्ञानेश्वर माउलींचे आजोळ घर गांधीवाडा विविध रंगीत फुलांच्या माळांनी सजवण्यात आला.

# ‘‘ रुग्ण सेवेत पांडुरंग शोधणारी आरोग्य वारी ’’
## वारी वृत्तांत २०२४

- वैद्य सुमित साळुंखे

वारी म्हणजे काय ?

भौतिकातून ---------- अभौतिकात

लौकिकातून ----------- अलौकिकात

स्वार्थातून ----------- परमार्थात

बहिरंगातून -----------अंतरंगात

अंर्तदेह भावातून --------- देवभावात

लीन होण्यासाठी जी श्री विश्वपंढरी कोल्हापूर ते पंढरपूर पायी यात्रा होते ती म्हणजे वारी.

‘‘श्री विश्वनाथ महाराजांच्या आत्मरुपापासून पंढरीच्या परमात्म्यापर्यंतचा हा आत्मिक समृद्धीचा भव्य सुंदर मार्ग म्हणजे वारी. ’’

आषाढी वारीच्या निमित्ताने शेकडो मैल पायी चालत विठ्ठलाच्या दर्शनाला जाणारी दिंडी सर्वश्रुत आहे. पंढरीला जाण्यासाठी असणारा वारीचा मार्ग बदलून ग्रामीण भागातील रुग्णांची सेवा करणारी ही आपली आरोग्य दिंडी दिली.

श्री विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट कोल्हापूर व दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान कोल्हापूर यांच्या तर्फे गेली २५ वर्षे ही सेवा अविरतपणे सुरु आहे.

वारीची सुरुवात प.पू. माधवनाथ (दादा) महाराजांनी केली. सध्या या दिंडीची धुरा प.पू. आनंदनाथ (महाराज) सांगवडेकर सांभाळत आहेत. श्री निरंजनदास सांगवडेकर यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

७ जुलै सायंकाळी ६.३० वा. प. पू. आनंदनाथ महाराजांनी विश्वनाथ महाराजांच्या पादुकांना अभिषेक केला. यावेळी पालखीच्या प्रस्थान सोहळयाला कोल्हापूरचे खासदार श्रीमंत शाहू महाराज आमदार श्री ऋतूराज पाटील व निरंजनदास सांगवडेकर उपस्थित होते.

८ जुलै २०२४ रोजी सकाळी ७ वा. चैतन्यमय वातावरणात टाळ व मृदुंगाच्या जय घोषात दिंडीचे प्रस्थान झाले. श्रीराम सोसायटी, कसबा बावडा या ठिकाणी नाष्ट्याच्या विसाव्यासाठी दिंडी थांबली. दुपारी १ च्या सुमारास बिरदेव मंदिर, टोप या ठिकाणी दिंडी पोहचली. दुपारचा प्रसाद व विश्रांती घेऊन हरिनामाचा जयघोष करत विठ्ठल मंदिर, पेठवडगाव याठिकाणी चहाच्या विसाव्यासाठी पोहचली. रात्रीच्या मुक्काम ‘इरा मंगल कार्यालय’, पेठवडगाव याठिकाणी पोहचली. तिथे राम

काकांचे मधूर प्रवचन झाले.

९ जुलै २०२४ रोजी सकाळी ६.३० वा दिंडीचे प्रस्थान झाले. ९ वा. वारणा नदी पार करुन शिगांव याठिकाणी नाष्ट्यासाठी पोहचली. दुपारचा प्रसाद जायंटस् मंगल कार्यालय, आष्टा याठिकाणी घेऊन सायं. ४ वा . पृथ्वी मल्टीपर्पज हॉल बसुगडे मळा याठिकाणी चहाचा विसावा घेऊन सद्गुरु परंपरेच्या गजरात नारायणतीर्थ स्वामी मठ, औदुंबर याठिकाणी पोहचली.

१० जुलै २०२४ तसा वारीतला भाग्यचा दिवस प.पू आनंदनाथ महाराजांनी प. पू. श्री विश्वनाथ महाराजाच्या पादुकांना कृष्णा स्नान घातले. त्यानंतर दत्त महाराजांची व विश्वनाथ महाराजाची भेट झाली. औदुबंरमधून भिलवडीकडे प्रस्थान केले. भिलवडीत फुलांच्या वर्षावात स्वागत झाले. नंतर भिलवडी स्टेशन येथे नाष्ट्याचा विसावा घेऊन दत्तगुरुंचा जयघोष करत जि.प शाळा निमणी याठिकाणी दुपारचा प्रसाद झाला. मोठे टाळ - मुदृंगाच्या गजरात रिंगण सोहळा झाला. नंतर तासगावकडे प्रस्थान केले. तासगाव येथील मार्केट यार्ड येथे चहाचा विसावा घेऊन सायं. प.पू. महादेवनाथ महाराज समाधी मंदिर याठिकाणी दिंडी पोहचली. प.पू. सद्गुरु विश्वनाथ महाराज पादुकांची व महादेवनाथ महाराजांच्या समाधी पादुकांची भेट झाली. मंदिर परिसर हरिनामाच्या गजराने मंत्रमुग्ध झाला. त्यानंतर सागर मल्टीपर्पज हॉल याठिकाणी दिंडी मुक्कामाला पोहचली.

११ जुलै २०२४ रोजी सकाळी ६.३० वा. दिंडीचे प्रस्थान झाले. अभंग म्हणत दिंडी आरवडे ठिकाणी पोहचली. नाष्ट्याच्या विसाव्यानंतर दिंडी बस्तवडे याठिकाणी दुपारचा प्रसाद घेऊन सायंकाळी ग्रामीण रुग्णालय करंजे याठिकाणी मुक्कामी पोहचली. आपल्या सुंगधी दिंडीचा हा जो सुंगध आहे. भक्तीचा सद्गुरु कृपेचा व पांडुरंगाच्या तीव्र ओढीचा आहे. श्री विठ्ठलाच्या गजरात आपली दिंडी प्रस्थान करत आहे. या हरिनामातून परमेश्वराशी मुक्त संवाद होत आहे. याला 3G, 4G, 5G या सारख्या मोबाईल रेंजची गरज नाही. हरिनामाचा टाळ वाजवला की पांडुरंग online च असतो. सायंकाळी राम काकांचे रसाळ प्रवचन झाले.

अशा भक्तीमय वातावरणामध्ये प.पू. सद्गुरु आनंदनाथ महाराजांच्या सहवासात दिंडी चालत आहे.

१२ जुलै २०२४ रोजी दिंडी प्रस्थान झाले. सुंदर भिवघाट पार करुन म्हसोबाचे दर्शन घेऊन दिंडी नाष्ट्याच्या विसाव्यासाठी थांबली. श्री राम हायस्कूल गोमेवाडी याठिकाणी दुपारचा प्रसाद घेऊन सायं ४ वा. डॉ. अभिजीत जानकर क्लिनिकला चहाचा विसावा घेऊन सायं ६.०० वा. कृषीतंत्र महाविद्यालय भिंगेवाडी

याठिकाणी दिंडी मुक्कामी पोहचली. रामकाकांचे सुमधूर प्रवचन झाले.

१३ जुलै २०२४ रोजी भिंगेवाडी याठिकाणी रिंगण सोहळा पार पडला. दुपारी कल्लेश्वर मंदिर याठिकाणी दुपारच्या प्रसादाला पोहचली. अभंग व भजनाच्या नादाने मंदिर परिसर गजरात भिजून गेला. रात्री गारमेंन्ट फॅक्टरी याठिकाणी दिंघचीला पोहचली. यावर्षी पहिल्यांदाच वारीसाठी आलेला रामानुज कृष्णा याने राम संकीर्तन याविषयी सुंदर विवेचन केले. नंतर रामकाकांचे प्रवचन झाले.

१४ जुलै २०२४ रोजी दिंघचीहून दिंडीचे प्रस्थान झाले. गणेश मंदिर याठिकाणी नाष्ट्याचा विसावा घेऊन दुपारी शेरेवाडी याठिकाणी प्रसाद घेऊन सायंकाळी फिनिक्स इंग्लिश मेडियम स्कूल, महूद याठिकाणी दिंडी पोहचली. संध्याकाळी रामकाकांचे प्रवचन झाले. व ज्यासाठी सर्व साधक वाट पाहत असतात. ते म्हणजे प. पू. आनंदनाथ महाराजांचे आशीर्वचन शब्द ऐकायला मिळणे, त्याप्रमाणे सद्‌गुरुंचे आशीर्वचन झाले.

१५ जुलै रोजी सकाळी ६.३० वा. दिंडीचे प्रस्थान झाले. सकाळी अनपट वस्ती येथे सकाळचा नाष्टा विसावा घेऊन, दुपारी हनुमान मंदिर सोनके या ठिकाणी दिंडी पोहचली. हनुमान मंदिर येथे टाळ - मृदुगांच्या आवाजात श्री रामांचा जयघोष झाला. नंतर विठूरायाच्या ओढीने दिंडी पंढरपूर मध्ये पोहचली.
संत तुकाराम म्हणतात ,

**हा रस आनंदाचा । घोष करा हरिनामाचा ।**
**कोण हा देवाचा । भाग पावेल येथील ।।**

हरिनामाचा जयघोष करणे, हा आनंदाचा रस आहे. जो कोणी भाग्यवान असेल त्यालाच हे भाग्य मिळेल. तोच या आनंदाचा वाटेकरी होईल. हे परम भाग्य आपल्याला लाभले ते फक्त आनंदनाथ महाराजांच्या मुळेच.

दरवर्षी प्रमाणे दिंडी मार्गावर सामाजिक उपक्रम राबविले गेले.

१. वारी मार्गावर तब्बल १० ठिकाणी सेवाभावी आयुर्वेद उपचार शिबीरे झाली. या आठ दिवसात २७०० रुग्णांनी आयुर्वेद उपचाराचा लाभ घेतला.

२. वारी मार्गावर शाळेत समुपदेशन केले जाते यामध्ये वैद्य गौरी बोरकर, वैद्य सुमित साळुंखे व रितेश मोरे यांनी मार्गदर्शन केले.

३. हरित विश्व - हरित वारी उपक्रमातंगर्त आरवडे व करंजे याठिकाणी वृक्षरोपण करण्यात आले.

४. जि.प. शाळा बस्तवडे याठिकाणी १२ खुर्च्या प्रदान करण्यात आल्या. अशा पद्धतीने वारीचे सुंदर नियोजन पार पडले.

या वारीमध्ये अखंड सद्‌गुरुंचे सान्निध्य लाभले. प. पू. सद्‌गुरुंच्या

सहवासात चैतन्यमय वातावरणात वारी करण्याचे भाग्य सर्व साधकांना लाभले. आशीर्वचनामध्ये  श्री सद्‌गुरु आनंदनाथ महाराजांनी सांगितले की रोज ज्ञानेश्वरी वाचावी व वारीत साधना व जप करावा. तेच अनुसंधान वर्षभर ठेवून नियमित साधना करावी. ही श्वासाची वारी नियमित आपण जपून ठेवून अनुसंधानात रहावे.

'तू मन हे मीचि करी ।माझिया भजनी प्रेम धरी ।।'

या श्लोकातच वारी  अर्थ दडला आहे हे सद्‌गुरुनी सांगितले. मन व बुद्धी एकत्र केली तर अखंड या वारीतच राहू. कायम अनुसंधानात राहू'' असे आशिर्वचनात सद्‌गुरुंनी सांगितले.

आपल्या साधकात वारी संपताना वारी संपूच नये, असे भाव सर्वांचे झाले होते. आपल्या प्रत्येक साधकाची वारी कधीच चुकू नये. प्रत्येक वर्षी प्रत्येक साधकाला वारी सेवा करायला मिळो ही सद्‌गुरु चरणी प्रार्थना ।

१७/०७/२०२४

आषाढी एकादशी निमित्त श्री विश्वपंढरी येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीस श्री आनंदनाथ महाराज यांनी अभिषेक व षोडषोपचार पूजा केली. आषाढी एकादशी निमित्त सर्व भाविकांना थेट मूर्ती दर्शनाची सोय उपलब्ध करुन देण्यात आली होती.  दिवसभर मंदिर दर्शनासाठी खुले होते. एकादशी निमित्त केळी व फराळाच्या साहित्याचे वाटप करण्यात आले. आसपासच्या परिसरातील अंदाजे ५००० भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.

२१/०७/२०२४

गुरुपौर्णिमा निमित्त स. ९ वा. शेकडो भाविकांच्या उपस्थितीत श्री दादा तथा माधवनाथ महाराज यांच्या समाधीस श्री आनंदनाथ महाराज यांनी अभिषेक व पूजा केली. या नंतर श्री निरंजन यांनी श्री आनंदनाथ महाराज यांची पाद्यपूजा केली. यानंतर साधकांनी सद्‌गुरुंचे दर्शन घेतले. महाप्रसादाने गुरुपौर्णिमा कार्यक्रमाची सांगता झाली.

२०/०८/२०२४

गोकुळ अष्टमी निमित्त श्री विश्वपंढरी येथे २० ऑगस्ट ते २६ ऑगस्ट २०२४ या काळात सात दिवसीय श्रीज्ञानेश्वरी पारायण आयोजित करण्यात आले होते. पारायणास विश्वपंढरी येथील साधक उपस्थित होते.

२६/०८/२०२४

गोकुळ अष्टमी निमित्त श्री विश्वपंढरी येथे श्री कृष्ण जन्मकाळ संपन्न झाला. या सद्गुरु श्री आनंदनाथ महाराज यांच्या सह सांगवडेकर कुटुंबीय आणि साधक वर्ग उपस्थित होता. सुंठवडा वाटप होऊन कार्यक्रम सांग झाला.

०७ /०९/२०२४

श्री स्वानंदराज्यधिपती गणेशोत्सव २०२४ च्या पहिल्या दिवशी 'श्रीं'ची आरती माजी गृहराज्यमंत्री मा. श्री सतेज उर्फ बंटी पाटील यांच्या हस्ते संपन्न झाली. याप्रसंगी श्री आनंदनाथ सांगवडेकर, (अध्यक्ष विश्वपंढरी) श्री निरंजनदास सांगवडेकर, (अध्यक्ष विश्वपंढरी तरुण मंडळ), सांगवडेकर कुटुंबीय, विश्वपंढरी तरुण मंडळाचे कार्यकर्ते आणि भाविक उपस्थित होते.

०८/०९/ २०२४

गणेशोत्सवाच्या काळात दरवर्षी गणेश यागचे आयोजन करण्यात येत असते. श्री स्वानंदराज्यधिपती गणेशोत्सव २०२४ च्या दुसऱ्या दिवशी सकाळी श्री हेरंभगणेश यागाचे आयोजन करण्यात आले होते. मंत्रांच्या उच्चाराने वातावरण पवित्र व भक्तिमय बनले होते. पूर्णाहुतीनंतर आरती झाल्यावर उपस्थितांनी प्रसादाचा लाभ घेतला.

श्री स्वानंदराज्याधिपतींची आरती कोल्हापूरचे खासदार श्रीमंत श्री शाहू महाराज छत्रपती यांच्या हस्ते झाली. याप्रसंगी श्री आनंदनाथ सांगवडेकर, (अध्यक्ष विश्वपंढरी) श्री निरंजनदास सांगवडेकर, (अध्यक्ष विश्वपंढरी तरुण मंडळ), सांगवडेकर कुटुंबीय, विश्वपंढरी तरुण मंडळाचे कार्यकर्ते आणि भाविक उपस्थित होते.

०९/०९/२०२४

श्री स्वानंदराज्याधिपतींची आरती कोल्हापूर (दक्षिण)चे आमदार श्री ऋतुराज पाटील, कोल्हापूरच्या आयुक्त सौ के. मंजुलक्ष्मी आणि additional commissioner Central GST सबरीश जी. यांच्या हस्ते झाली.

१० /०९/२०२४

श्री स्वानंदराज्यधिपती गणेशोत्सव २०२४ च्या चौथ्या दिवशी श्रींची

आरती माजी आमदार श्री सुजित मिणचेकर यांच्या हस्ते संपन्न झाली. यावेळी ट्रस्ट चे अध्यक्ष श्री आनंदनाथ सांगवडेकर, श्री विश्ववती चे अध्यक्ष निरंजनदास सांगवडेकर,तसेच विश्वपंढरी चा साधक वर्ग उपस्थित होता.

११/०९/२०२४

श्री स्वानंदराज्याधिपतींची आरती राज्य नियोजन महामंडळचे कार्यकारी अध्यक्ष आमदार श्री राजेशजी क्षिरसागर यांच्या हस्ते संपन्न झाली.

आरती झाल्यानंतर दीपोत्सव करुन यावर्षी चा गणेशोत्सव सोहळ्याचा समारोप झाला. समारोप सोहळ्यात श्री आनंदनाथ महाराज यांनी आशिर्वचनपर मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात श्री विश्ववती चे अध्यक्ष निरंजनदास सांगवडेकर यांनी, २००४ पासून आजवर गणेशोत्सव सोहळ्यात सदगुरु संकल्पाचे महत्त्व विशद करताना, सद्‌गुरु नियोजित कार्य विविध व्यक्तींकडून कसे करून घेतात व आपण निमित्तमात्र आहोत.तसेच आजवर या कार्यात कार्यकर्ते, साधक, मित्र यांनी केलेल्या सहकार्याचा उल्लेख करून त्या बद्दल आभार व्यक्त केले. या वर्षी सर्वांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले.

१७ सप्टें ते २३ सप्टें २०२४ या सात दिवसात श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी जयंती निमित्त विश्वपंढरी येथे श्री ज्ञानेश्वरी पारायण संपन्न झाले. ४५ साधक पारायणास बसले होते.

२९/१०/ २०२४

श्री धन्वंतरी जयंती निमित्त श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व रिसर्च सेंटर येथील श्री धन्वंतरी देवतेस अभिषेक / षोडपचार पूजा श्री आनंदनाथ महाराज यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळेस श्री विश्ववती चे अध्यक्ष निरंजनदास सांगवडेकर यांच्या सह विश्वपंढरी समूहाचा सर्व कर्मचारी वर्ग उपस्थित होता. धनत्रयोदशी निमित्ताने सर्व कर्मचारी वर्गास,तसेच आर्युवेदीक औषधी कंपन्यांच्या विक्री प्रतिनिधी यांना दिवाळी भेट देण्यात आली.

३१/१०/२०२४

श्री विश्ववती चे अध्यक्ष निरंजनदास सांगवडेकर यांच्या वाढदिवसानिमित्त गंगावेश कोल्हापूर येथे मातृभूमी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या उत्तरेश्वर थाळी उपक्रमांतर्गत समाजातील उपेक्षित घटकांना अन्नदान वाटप करण्यात आले.

१५/११/२०२४

त्रिपुरारी पौणिमेनिमित्त श्री विश्वपंढरी येथे तुलसी विवाह संपन्न झाला. या नंतर दिपोत्सव व प्रसाद वाटप होऊन कार्यक्रम सांग झाला.

२२/११/२०२४

श्री माऊलींच्या संजीवन समाधी दिना निमित्त विश्वपंढरी मधील श्री माऊलींच्या मूर्तीला अभिषेक करण्यात आला. तसेच संजीवन समाधी निमित्त सात दिवस श्री ज्ञानेश्वरी ग्रंथांचे पारायण संपन्न झाले.

११/१२/२०२४

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी श्री दत्त जयंती निमित्ताने श्री विश्वपंढरी, कोल्हापूर येथे तीन दिवसाच्या गुरुचरित्र ग्रंथ पारायणाचे आयोजन करण्यात आले. या पारायणाची सुरवात श्री कलश स्थापना व प्रतिमाचे पूजन श्री सद्‌गुरु आनंदनाथ महाराज सांगवडेकर यांच्या हस्ते करून झाली. या तीन दिवस पारायण सोहळ्यात सकाळी सहा ते दुपारी बारा या वेळेत पारायण, दुपारी भोजन व विश्रांती, संध्याकाळी सामूहिक जप, त्या नंतर आरती व भोजन त्यानंतर विश्रांती असे तीन दिवसाच्या कार्यक्रमाचे स्वरूप होते.

२२/१२/२०२४

श्री सद्‌गुरु दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान (विश्वपंढरी), कोल्हापूर यांचे मार्फत नाशिक हून कोल्हापूर दौऱ्यावर आलेल्या ६० अंध विद्यार्थी व स्टाफ यांना प्रवासा दरम्यान अल्पोआहारची व्यवस्था करण्यात आली

१२/०१/२०२५

आपल्या सद्‌गुरुंचे व विश्व परिवाराचे उपास्य दैवत असलेल्या अतिग्रे येथील श्री मारुतीरायांना अभिषेक व पूजा करण्यात आली. तसेच आपल्या सर्वांचे आराध्य श्री सद्‌गुरु विश्वनाथ महाराज व श्री सद्‌गुरु गोविंदनाथ महाराज यांच्या समाधीस अभिषेक व पूजा करण्यात आली तसेच उत्सवाचे निमंत्रण म्हणून कार्यक्रम पत्रिका चरणी अर्पण करण्यात आली

२३/०१/ २०२५

आनंद भुवन, विठ्ठल मंदिर मिरजकर तिकटी येथील श्री सद्‌गुरु रामचंद्र

महाराज यांच्या पादुकांची श्री आनंदनाथ महाराज यांच्या हस्ते पूजा करण्यात आली. तसेच मुनींद्र विश्वनाथ महाराज रुकडीकर यांच्या १०५ व्या पुण्यस्मरण सोहळ्याच्या आमंत्रणाची पत्रिका श्री चरणी अर्पण करण्यात आली.

# १०६ वा. प.पू.श्री विश्वनाथ महाराज रुकडीकर पुण्यतिथी वृत्तांत सोहळा.

-श्री.चंद्रशेखर देशपांडे.

दि. २६ /१/२०२५ -

सकाळी ठीक ८.०० वाजता प. पू. विश्वनाथ महाराज यांच्या पादुकांची पुजा करुन प. पू. दादांच्या जुन्या घरापासून मंदिरापर्यंत अत्यंत उत्साहात पालखी सोहळा संपन्न झाला. भजन, नाम संकीर्तन अशा अनेक पद्धतीने भक्तांनी उत्साहामध्ये पालखी मंदिरापर्यंत आणली व नंतर प. पू. औसेकर महाराज व प.पू. आनंदनाथ महाराज यांच्या हस्ते पादुकांना अभिषेक करुन पादुकांची प्रतिष्ठापना केली. नंतर प.पू. औसेकर महाराजांनी गुरु सेवा केल्याशिवाय इच्छित साध्य प्राप्त होत नाही. हे सांगून त्याविषयी रसाळ निरुपण केले.

नंतर ज्ञानेश्वरी पारायणास सुरुवात झाली. सायंकाळी आदरणीय विवेक घळसासी यांचे सुंदर प्रवचन झाले. अध्यात्म म्हणजे पूर्णता या विषयावर ते बोलले. स्वत: साधकाने सद्गुरुंचे स्वरुप प्राप्त करुन घेणे हेच साध्य आहे, असे त्यांचे सुंदर निरुपण झाले.

नंतर श्री राहूल सोलापूरकर यांचे राजर्षि छत्रपती शाहु महाराज यांच्यावर व्याख्यान झाले. राजेंचे समाजाप्रती असलेले सामाजिक भान, प्रेम, जाणीव व त्यांच्याबद्दलची काळजी हे सर्व त्यांनी आपल्या व्याख्यानात अतिशय श्रवणीय पद्धतीने सांगितल. राजांच्या जीवनातील अनेक प्रसंग त्यांनी अत्यंत मार्मिकतेने सांगितले.

दि. २७/१/२०२५

अध्यात्मातील पूर्णतेमध्ये येणारे अडथळे यावर श्री. ह.भ.प. घळसासी यांनी सुंदर विवेचन केले. भक्ताने, हळुवार, संवेदनशील असले पाहिजे विचाराने चिंतनाने ते अडथळे दूर होतात. सद्गुरुंना शरण जाऊन अहंकार व भय नाहीसे करता येते असे त्यांनी यावर सखोल विवेचन केले.

रात्री ह.भ.प. बाळासाहेब महाराज देहुकर यांचे सुश्राग्य कीर्तन झाले.

प.पू. तुकाराम महाराज यांचे ते वंशज आहेत.

दि. २८/१/२०२५

श्री ह. भ. प. पटवारी यांचे सायंकाळी रसाळ प्रवचन झाले. 'पुण्यान निमान परम भागवतान स्मरामी' या श्लोकावर अत्यंत श्रवणीय असे सर्व संतांचे चरित्र त्यांनी सांगितले.

यानंतर ह.भ.प. मंडेवाल यांचे नारदीय कीर्तन झाले.

दि.२९/१/२०२५

सायंकाळी सत्रात ह.भ.प. पटवारी यांनी भक्त प्रल्हाद पासून विभिषणा पर्यंत सर्व चौदा संतांचे चरित्र अत्यंत रसाळ पद्धतीने सांगिले. (प्रल्हाद, नारद, पराशर, पुंडलिक, व्यास, अम्बरीष, किंवा अंबरीष शुक, शौणक, भीष्म, दाल्भ्याम, रुक्मांगद, कार्तवीर्यार्जुन वसिष्ठ, विभिषण)

यानंतर सद्गुरु श्री. वसंतगडकर महाराज यांचे श्रवणीय कीर्तन झाले. त्यामध्ये त्यांनी मनाला वश करुन सोऽहं साधना कशी सुंदर करता येते ते सांगितले व सद्गुरुशिवाय तरणोपाय नाही ते अप्रतिम समजावुन सांगितले.

३०/१/२०२५

सकाळी ज्ञानेश्वरी पारायण झाल्यावर सांगता समारंभामध्ये श्री निरंजननाथ महाराज यांनी श्री ज्ञानेश्वरीतील अनेक ओव्यांवर सुंदर निरुपण केले.

सायंकाळी नित्य गुरुवारची पालखी व ३० वा माऊली आनंदी पुरस्कार सुमेधाताई चिथडे यांना प.पू. महाराज व आईसाहेब यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.सुमेधाताई चिथडे यांनी जगातल्या सर्व उंच रणभूमीवर ऑक्सिजन प्लॅट उभा करताना आलेले अनुभव अतिशय सुंदर पद्धतीने सांगितले. या कार्यक्रमासाठी मा. आमदार सतेज पाटील हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते.

यानंतर श्री सद्गुरु वसंतगडकर महाराजांनी ज्ञानेश्वरी माऊलीच्या विरहिणी अतिशय सुंदर गाऊन निरुपण केले. जीवाचा आत्म्यापासून परमात्म्यापर्यंतचा प्रवास म्हणजे साधना असे सुंदर वर्णन त्यांनी केले. ज्ञान हे साधन म्हणून वापरले पाहिजे. ते साध्य नव्हे हे ही महत्वाचे प्रतिपादन त्यांनी केले.

३१/१/२०२५

सकाळी धर्मनाथ बीजेचा सुंदर सोहळा संपन्न झाला. ।। शिव गोरक्ष ।।

विश्वपंढरी मधे धर्मनाथबीज निमित्त श्री गोरक्षनाथ महाराजांच्या पादुकांचा अभिषेक संपन्न झाला.

माघ महिन्यातील द्वितीया, जिला धर्मनाथबीज असें म्हणतात या तिथीला नाथपंथात विशेष महत्व आहे. या दिवशीं श्री गोरक्षनाथांनी धर्मनाथांना अनुग्रह देऊन दीक्षा दिली. त्या वेळेस सर्व देवी देवतांना आमंत्रित केले होते. तसेच प्रयाग क्षेत्रातील सर्व नगरवासी लोकांचाही मोठा मेळा जमला होता. यादिवशी भव्य भंडारा (अन्नदान) झाला. श्रीगोरक्षनाथांनी आपल्या हातांनी सर्वांना प्रसाद दिला. यामुळे सर्वांना अतिशय आनंद झाला. देवांसह सर्वांनी दरसाल असाच उत्सव होऊन प्रसाद मिळावा अशी इच्छा प्रकट केली. श्री गोरक्षनाथांनी 'धर्मनाथबीजेचा' उत्सव प्रतिवर्षीं करण्याची त्रिविक्रमास आज्ञा दिली. तेव्हां सर्वास आनंद झाला व दरसाल या दिवशीं उत्सव होऊ लागला. गोरक्षनाथांनी आपल्या 'किमयागिरी'नामक ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं. आपापल्या शक्तिनुसार जो कोणी हें बीजेचें व्रत करील त्याच्या घरीं दोष, दारिद्र्य, रोग आदिकरुन विघ्नें स्वप्नांत देखील यावयाची नाहींत. त्या पुरुषांचा संसार सुनियंत्रित चालेल. प्रत्यक्ष लक्ष्मी त्याच्या गृहीं वास्तव्य करील. याप्रमाणें धर्मनाथ बीजेचा महिमा होय.

सायंकाळी ह.भ.प. विवेक बुवा गोखले यांचे सुंदर प्रवचन झाले. प.पू. नारायण स्वामी यांचे अतिशय श्रवणीय असे चरित्र सांगत असतांना प.पू. गुळवणी महाराजांचे चरित्र सांगितले. अतिशय सुंदर श्रवणीय अशी चरित्राने सर्वांची हृदये व्यापून गेली. या नंतर ह.भ.प.श्री शरदबुवा घाग यांचे नारदीय कीर्तन झाले.

१/२/२०२५

सकाळी प.पू. विश्वनाथ महाराज चरित्र पारायण झाले. व नंतर ह.भ.प. वासुदेवशास्त्री जोशी यांचे काल्याचे श्रवणीय कीर्तन झाले.सायंकाळी सांगता कार्यक्रमात आक्कासाहेब सांगवडेकर यांनी साधकांना मार्गदर्शन केले तसेच श्री निरंजनदास सांगवडेकर यांनी पुढील काळात होणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. प.पू. आनंदनाथ महाराज यांचे आशीर्वचन झाले. त्यांनी सेवा, ज्ञानेश्वरी आणि साधना या मार्गातूनच सद्गुरुंची कृपा होते असे अत्यंत प्रभावीपणे सांगितले.

२०/०३/२०२५

**श्री माधवनाथ महाराज यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी**

दि. २० मार्च रोजी श्री दादा तथा माधवनाथ महाराज यांच्या जयंतीनिमित्त विश्वपंढरी येथे सकाळी श्री दादांच्या चरणसमाधीस श्री आनंदनाथ महाराज यांच्या हस्ते अभिषेक व पूजा करण्यात आली. त्यांनतर तीन दिवसीय सुरु असणारी श्री सिद्धेश्वरी ग्रंथ पारायण सांगता झाली.. सायंकाळी श्री आनंदनाथ सांगवडेकर यांच्या हस्ते जन्म काळ सोहळा संपन्न झाला. यावेळी कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील साधक उपस्थित होते.

श्री सद्गुरु दादा महाराज सांगवडेकर यांची जयंती निमित्त उपजिल्हा रुग्णालय (कॉटेज हॉस्पिटल) कराड येथे रुग्णांना चहा व बिस्कीट वाटप करण्यात आले. तर पैठण येथील संस्थेच्या 'आनंदभुवन' संकुलात आयुर्वेदिक तपासणी व उपचार शिबीर संपन्न झाले या शिबीराचा १०२० रुग्णांनी लाभ घेतला. तसेच श्री दादांच्या जयंती निमित्त दु.१२ ते ३ या वेळेत 'अन्नदान सेवा'संपन्न झाली. या 'अन्नदान सेवे'चा १५०० यात्रेकरु / भाविकांनी लाभ घेतला.


॥ॐ॥श्री॥卐॥

**श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व रिसर्च सेंटर**

चला... भारत सशक्त करूया !

आरोग्य रक्षक
Ayurvedic Family Care Clinic

'विश्ववती', ६९७/ब, श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर मार्ग, मंगळवार पेठ,
कोल्हापूर-४१६०१२-संपर्क क्र-०२३१-२६२४०४४/७३५०६२३६३६

**पश्चिम महाराष्ट्रातील अग्रगण्य मल्टीस्पेशालिटी आयुर्वेदिक चिकित्सालय**

- तज्ञ व अनुभवी वैद्य
- सुसज्ज इमारत
- अद्ययावत पंचकर्म कक्ष
- सेवाभावी कर्मचारी वर्ग
- माफक दरात उपचार
- विशेष आयुर्वेदिक शिबीरे



## निरंतर सेवाकार्य

# श्री सद्‌गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर

०३/ ०५/ २०२४

आहिल्याबाई होळकर शासकिय वैद्यकिय महाविद्यालय बारामती येथे श्री सद्‌गुरु  दादा महाराज सांगवडेकर पुण्यतिथि निमित्त २ व्हिल चेअर चे वितरण करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे अधिकारी उपस्थित होते

३१/०५/२०२४

श्री सद्‌गुरु  विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट व विश्वपंढरी समूहातर्फे कोल्हापूर महानगर पालिका संचलित पंचगंगा स्मशानभूमी येथे क्रमांक एक ते क्रमांक १२ या शव दाहिनी साठी क्रमांक दर्शवणारे व त्यासोबत नैवेद्य ठेवणेसाठी ट्रे चा वापर करणाऱ्या सुचनेचा अंतर्भाव असणारे फलक तसेच साहित्य ठेवण्यासाठी लाकडी कपाट प्रदान करण्यात आले. यापूर्वी श्री दादा महाराज सांगवडेकर यांच्या समाधी दिनानिमित्त स्टेनलेस स्टीलचे १२ ट्रे नैवेद्य ठेवण्यासाठी पंचगंगा स्मशानभूमीस प्रदान करण्यात आले आहे.

२१/०६/२०२३

श्री सद्‌गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट तर्फे आषाढी वारी दरम्यान संपूर्ण वारी काळात, विविध गावांमध्ये जिथे दिंडीचा मुक्काम असतो. तिथे शाळांमध्ये  वैद्य सौ.गौरी बोरकर, वैद्य श्री सुमित साळुंख व श्री रितेश मोरे यांनी विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यशाळा घेतल्या. विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत असतात. विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबीर यांचा यात प्रामुख्याने समावेश होतो. श्री.बापूसाहेब पाटील विद्यालय , अंकल खोप (जिल्हा सांगली) येथे वैद्य गौरीबोरकर यांनी योग आणि आयुर्वेद या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले याच विद्यालयातील मुलांशी  वैद्य सुमित साळुंखे यांनी आयुर्वेद निरोगी जीवनाची गुरुकिल्ली या विषयावर मार्गदर्शन केले.

०५/०८/२०२४

श्री सद्गुरु  विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट कोल्हापूर आणि श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय रिसर्च सेंटर कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने श्री आनंदनाथ सांगवडेकर यांच्या वाढदिवसानिमित्त जिद्द मतिमंद शाळा चिपळूण येथे घेण्यात आलेल्या आयुर्वेदिक तपासणी व चिकित्सा शिबिराचे उद्घाटन डॉक्टर सौ कोतकुंडे मॅडम व श्री मंगेश पेढांरकर, प्रशासकीय अधिकारी चिपळूण नगरपालिका यांच्या हस्ते झाले .या शिबिरामध्ये जिद्द मतिमंद मुलांच्या शाळेतील विद्यार्थी व पालक यांना तपासणी करून औषधे वितरित करण्यात आली. यावेळी वैद्य सत्यजित एकांडे व इतर उपस्थित होते.

०६/०८/२०२४

कोल्हापूर येथील श्री राजर्षि शाहूमहाराज स्थापित भाकड व भटक्या गायींचा सांभाळ करणाऱ्या पांजरपोळ संस्थेस चारा वाटप तसेच आर्थिक मदत श्री निरंजनदास सांगवडेकर व सौ. ऋचा सांगवडेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

१५/०८/२०२३

भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त विश्वपंढरी कोल्हापूर येथे झेंडावंदन श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालयाचे अध्यक्ष श्री निरंजनदास सांगवडेकर यांच्या हस्ते संपन्न झाले.

ध्वज वंदन झाले नंतर गांधीनगर,वळीवडे येथील पूरबाधित सरिता कांबळे यांच्या घराच्या दुरुस्तीस आर्थिक मदत ट्रस्टचे अध्यक्ष आनंदनाथ सांगवडेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. यावेळी विश्वपंढरी समूह संस्थांचे सर्व अध्यक्ष,पदाधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

०७/०९/२०२४

श्री स्वानंदराज्याधिपती गणेशोत्सव दरम्यान विश्वपंढरी तरुण मंडळातर्फे सामाजिक बांधिलकीच्या उद्देशाने आमदार श्री सतेज उर्फ बंटी पाटील यांच्या हस्ते झाली. अहिल्याबाई सेंट्रल स्कूल, मंगळवार पेठ, कोल्हापूर या शाळेला तीन ग्रीन बोर्ड आणि वॉटर प्युरीफायर प्रदान करण्यात आले. त्याचप्रमाणे २०१९ च्या पुरात ज्यांचे घर जमीनदोस्त झाले अश्या सौ साक्षी लोहार यांना ३ ब्रास फरशी देण्यात आली.

या कार्यक्रमावेळी श्री आनंदनाथ सांगवडेकर, (अध्यक्ष विश्वपंढरी)

श्री निरंजनदास सांगवडेकर, (अध्यक्ष विश्वपंढरी तरुण मंडळ), आमदार सतेज उर्फ बंटी पाटील, सांगवडेकर कुटुंबीय, विश्वपंढरी तरुण मंडळाचे कार्यकर्ते आणि भाविक उपस्थित होते.

०८/०९/२०२४

श्री स्वानंदराज्याधिपती गणेशोत्सव दरम्यान विश्वपंढरी तरुण मंडळातर्फे सामाजिक बांधिलकीच्या उद्देशाने कोल्हापूरचे खासदार श्रीमंत श्री शाहू महाराज छत्रपती यांच्या हस्ते महाराणी ताराराणी विद्यालय, मंगळवार पेठ या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी स्टडी टेबल प्रदान करण्यात आले.

या कार्यक्रमास श्री आनंदनाथ सांगवडेकर, (अध्यक्ष विश्वपंढरी) श्री निरंजनदास सांगवडेकर, (अध्यक्ष विश्वपंढरी तरुण मंडळ), खासदार शाहू महाराज, सांगवडेकर कुटुंबीय, विश्वपंढरी तरुण मंडळाचे कार्यकर्ते आणि भाविक उपस्थित होते.

# नागपूर विश्वव्याख्यानमाला २०२४

-वैद्य प्रसाद पांडकर

श्री सद्गुरू विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट आणि श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व रिसर्च सेंटर कोल्हापूर येथे आयोजित श्री विश्व व्याख्यानमाला या गेले अनेक वर्षे आयोजित केल्या जाणाऱ्या राष्ट्रीय आयुर्वेद परिसंवादाचे आठवे पर्व या वेळी दिनांक २०,२१,२२. सप्टेंबर २०२४ रोजी सुरेश भट सभागृह नागपूर येथे संपन्न झाले! परिसंवादासोबत तेथे जवळच्याच रेशिमबाग मैदानामध्ये आरोग्य एक्स्पो व मोफत रुग्ण तपासणी शिबिर देखील यशस्वीपणे पार पडले!

या तीन दिवसीय परिसंवादात पहिल्या दिवशी उद्घाटन मोठ्या आनंदात पार पडले. केंद्रीय रस्ते व परिवहन मंत्री श्री नितीनजी गडकरी यांचे हस्ते उद्घाटन झाले व त्यांचे मार्गदर्शन लाभले. देशात आयुर्वेदाला मान्यता आहे. आता पुढच्या पिढीने जगभर मान्यता मिळवण्याचे आव्हान स्वीकारावे असे ते म्हणाले, N.C.I.S.M. चे अध्यक्ष वैद्य देवपुजारी, वैद्यनाथ चे श्री सुरेश शर्माजी व सिद्धेशजी शर्मा, धूत पापेश्वर चे रणजित पुराणिक, महाराष्ट्र राज्य नियोजन महामंडळाचे अध्यक्ष श्री.राजेश क्षीरसागर, ट्रस्ट चे अध्यक्ष श्री. आनंदनाथ सांगवडेकर, श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालयाचे अध्यक्ष श्री. निरंजन सांगवडेकर हे मान्यवर उपस्थित होते.या पहिल्या दिवशी कर्नाटकमधील

रसवैद्य गोपीकृष्ण यांनी गंभीर आजारात रसौषधी यावर मार्गदर्शन केले. केरळ येथे जगातील सर्वांत मोठे आयुर्वेदीक नेत्र रुग्णालय श्रीधरियम येथील वैद्य श्रीकांत नंबूदिरी यांनी नेत्ररोगवर उत्तम मार्गदर्शन केले.शुगर चा डोळ्यावर परिणाम होवून रेटिना संबंधी होणारे आजार यावर त्यांनी विशेष मार्गदर्शन केले. नागपूरच्या श्री आयुर्वेद महाविद्यालयाचे उपप्राचार्य व नामवंत वैद्य मृत्युंजय शर्मा यांचे मणक्यांचे आजार यावर मार्गदर्शन लाभले.

दुसऱ्या दिवशी सर्व ज्येष्ठ वक्त्यांची पर्वणी होती. केरळचे ज्येष्ठ आयुर्वेद गुरू वैद्य वासुदेवन् नंबूदिरी यांनी आयुर्वेदातील रसायन चिकित्सा यावर मार्गदर्शन केले. जयपुरचे ज्येष्ठ वैद्य प्रा.श्रीकृष्ण शर्मा खांडेल यांनी मनोरोग याविषयी विवेचन केले. संस्कृत मध्ये असणारे मन, चित्त, सत्व हे सगळे शब्द मनाचे सरसकट पर्याय नाहीत व मनोव्यापारात नक्की कोणत्या टप्प्यावर काय बिघडू शकते. अनाईबत्यासाठी कशी औषधे द्यावीत यावर त्यांनी विवेचन केले., उडूपीच्या आयुर्वेद महाविद्यालयाच्या प्राचार्या वैद्य ममता के.व्ही. यांनी पॉली सिस्टिक ओव्हरी या व्यायामाच्या अभावातून होणाऱ्या आजच्या तरुण मुली- स्त्रियांमधील आजारावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशी आयुर्वेदातील विभिन्न करियर संधी बाबत एक परिसंवाद ही आयोजला होता. भोपाळ चे वैद्य प्रशांत तिवारी, उत्तरप्रदेश मधील वैद्य भोई, व पुण्याचे वैद्य प्रशांत दौंडकर यांनी त्यात मार्गदर्शन केले.

विश्व व्याख्यानमालेच्या शेवटच्या व तिसऱ्या दिवशी जळगावचे वैद्य महेश बिर्ला सरांचे व्याख्यान झाले. पंचकर्माविषयी सरांनी अभ्यासपूर्ण विवेचन केले.

यानंतर पहिला श्री विश्वस्मृती आयुर्वेद सन्मान पुरस्कार वितरित करण्यात आला. या पुरस्काराचे वितरण आयुर्वेद क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सन्माननीय वैद्यांना करण्यात आले.

यामध्ये आयुर्वेद व्यासपीठ चे संस्थापक अध्यक्ष आणि डोंबिवलीचे ज्येष्ठ चिकित्सक वैद्य विनय वेलणकर सर, धुळ्याचे सुप्रसिद्ध पंचकर्म तज्ञ वैद्य प्रवीण जोशी सर, कोपरगावचे सुप्रसिद्ध वैद्य रामदास आव्हाड सर, जेष्ठ चिकित्सक आणि अध्यापिका वैद्य मीरा औरंगाबादकर मॅडम,नागपूरचे सुप्रसिद्ध वैद्य धनराज गहूकर सर आणि अमरावतीतील जेष्ठ वनस्पती तज्ञ रामगिर गिरी यांना हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

परमपूज्य सद्गुरू आनंदनाथ महाराज आणि N.C.I.S.M. बोर्ड ऑफ एथिक्स अँड रजिस्ट्रेशन चे अध्यक्ष वैद्य राकेश शर्मा यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

यानंतर व्याख्यानमालेत झालेल्या पदव्युत्तर व phd विद्यार्थ्यांचे व वैद्य

रिसर्च पेपर आणि पोस्टर प्रेसेंटेशन चे पारितोषिक वितरण झाले. सुमारे २५० संशोधन पेपर इथे सादर केले गेले. त्यातील उत्कृष्ट पेपर्सना केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांच्या स्नुषा सौ मधुराताई गडकरी,बैद्यनाथ कंपनीच्या डायरेक्टर श्रुती प्रणव शर्मा यांचे हस्ते गौरविण्यात आले.

श्री विश्ववती चे प्रधान चिकित्सक वैद्य समीर जमदग्नी सर, धूतपापेश्वर लिमिटेडचे श्री रणजीत पुराणिक या अतितींसह प.पू.सद्गुरु आनंदनाथ महाराज, वैद्य समीर जमदग्नी सर आणि श्री निरंजन जी सांगवडेकर उपस्थित होते.या मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना आणि परीक्षकांना सन्मानित करण्यात आले..

यानंतर ज्येष्ठ वैद्य समीर जमदग्नी सरांचे व्याख्यान झाले व्याख्यानाला विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला सभागृह पूर्णतः भरलेले होते. २५०० च्या संख्येचे सभागृह खचाखच भरले होते!!

पसायदानाने कार्यक्रमाची आणि व्याख्यानमालेची सांगता झाली. व्याख्यानमाले विषयी अतिथींसह सर्व वक्त्यांनी आणि विद्यार्थ्यांनी खूप सकारात्मक आणि उत्साहवर्धक प्रतिक्रिया दिल्या.

१०/०२/२०२५

मुनींद्र श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर यांच्या १०५ व्या पुण्यस्मरण सोहळा विश्वपंढरी येथे साजरा झाला. या सोहळ्या दरम्यान पाचव्या दिवशी 'आनंदी आजी' यांच्या स्मरणार्थ श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट तर्फे प्रतिवर्षी देण्यात येणारा राज्यस्तरीय ''माऊली आनंदी'' पुरस्कार मा. आमदार श्री सतेज उर्फ बंटी पाटील यांच्या व आदरणीय आईसाहेब- श्यामला माधवनाथ सांगवडेकर यांच्या हस्ते सोल्जर इंन्डिपेंडंट रिहॅबिलेशन च्या संस्थापिका सौ.सुमेधाताई चिथडे यांना देण्यात आला. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष श्री आनंदनाथ सांगवडेकर तसेच श्री विश्ववती चे अध्यक्ष श्री निरंजन सांगवडेकर यांची तसेच वैद्य श्री समीर जमदग्नी, संगिता सांगवडेकर, सौ विश्वा सांगवडेकर, सौ. ऋचा सांगवडेकर, सर्व संस्थांचे विश्वस्त, साधक वर्ग उपस्थित होती.

१९/०२/२०२५

या भूमंडळाचे ठायी। धर्म रक्षी ऐसा नाही।
महाराष्ट्र धर्म राहिला काही। तुम्हांकारणे।।

शिवजयंती निमित्त विश्वपंढरी मध्ये श्री निरंजन सांगवडेकर यांनी छत्रपती शिवरायांच्या मूर्तीचे पूजन करुन पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

२०/०३/२०२५

**श्री माधवनाथ महाराज यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी**

श्री दादांच्या जयंतीनिमित्त ट्रस्टतर्फे सामाजिक कार्याअंतर्गत कोल्हापूर च्या पंचगंगा स्मशान भूमीस २५ हजार शेणीप्रदान श्री राहूलजी चिकोडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आल्या.

तसेच सोल्जर इंडिपेंडंन्ट रिहॅबिलेशन या संस्थेस आर्थिक मदतीचा चेक प्रदान श्री राहूलजी चिकोडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष श्री आनंदनाथ सांगवडेकर, श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालयाचे अध्यक्ष श्री निरंजन सांगवडेकर, सांगवडेकर कुटुंबीय व विश्वपरिवाराचे साधक उपस्थित होते.






# श्री सद्‌गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

श्री सद्‌गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

17/04/2024

श्री भवानीदेवी उत्पत्तीदिन कुंकूमार्चन









श्री सद्‌गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

23/04/2024

श्री हनुमान जन्मोत्सव

श्री सद्‌गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

28/04/2024 ते 30/04/2024

ध्यान शिबीर





श्री सद्‌गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

28/04/2024 ते 30/04/2024

ध्यान शिबीर

# श्री सद्गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

श्री सद्गुरू दादा महाराज
सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान,
कोल्हापूर

30/04/2024
श्री सद्गुरू दादा तथा माधवनाथ
महाराज पुण्यतिथी







श्री सद्गुरू दादा महाराज
सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान,
कोल्हापूर

30/04/2024
श्री दादा महाराज यांच्या
स्मृती संग्रहस्थळाचे उद्घाटन

श्री सद्गुरू दादा महाराज
सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान,
कोल्हापूर

21/05/2024
श्री नृसिंह जयंती निमित्त
श्री क्षेत्र सांगवडे येथे फळ वाटप






श्री सद्गुरू दादा महाराज
सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान,
कोल्हापूर

07/07/2024
मान्यवरांच्या हस्ते आषाढी
वारी सोहळ्याचा शुभारंभ

# श्री सद्‌गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर



श्री सद्‌गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

07/07/2024
आषाढी वारी प्रस्थान,
विश्वपंढरी, कोल्हापूर

श्री सद्‌गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

08/07/2024
वारकरी रथासोबत
मार्गस्थ होताना





श्री सद्‌गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

10/07/2024
श्री क्षेत्र औदुंबर येथे श्रींच्या
पादुकांना कृष्णास्नान

श्री सद्‌गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

17/07/2024
आषाढी एकादशी निमित्त
अभिषेक पूजा



# श्री सद्गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

श्री सद्गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

17/07/2024
आषाढी एकादशी निमित्त
श्री विठ्ठल रुक्मिणीची विशेष पूजा





श्री सद्गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

21/07/2024
गुरू पौर्णिमेनिमित्त
श्री दादांच्या समाधीस अभिषेक

श्री सद्गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

21/07/2024
गुरू पौर्णिमेनिमित्त
श्री आनंदनाथ महाराज यांची पाद्यपूजा





श्री सद्गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

27/08/2024
गोकुळ अष्टमी निमित्त
श्रीकृष्ण जन्मकाळ सोहळा संपन्न

# श्री सद्गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर





श्री सद्गुरू दादा महाराज
सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान,
कोल्हापूर

श्री स्वानंदराज्याधिपती
गणेशोत्सव 2024, याग

श्री सद्गुरू दादा महाराज
सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान,
कोल्हापूर

खासदार श्री शाहू छत्रपती व
विधानपरिषद आमदार
श्री. सतेज पाटील यांच्या हस्ते
श्री गणेशाची आरती.







श्री सद्गुरू दादा महाराज
सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान,
कोल्हापूर

को.दक्षिणचे आमदार
श्री.ऋतुराज पाटील व सबरीश जी
यांच्या हस्ते श्री गणेशाची आरती.

श्री सद्गुरू दादा महाराज
सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान,
कोल्हापूर

माजी आमदार
श्री. सुजित मिणचेकर यांच्या हस्ते
श्री गणेशाची आरती.



# श्री सद्‌गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

श्री सद्‌गुरू दादा महाराज
सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान,
कोल्हापूर

राज्य नियोजन महा.कार्यकारीअध्यक्ष
श्री. राजेश क्षिरसागर यांच्या हस्ते
श्री गणेशाची आरती





श्री सद्‌गुरू दादा महाराज
सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान,
कोल्हापूर

15/11/2024
कार्तिकी पौर्णिमेनिमित्त
विश्वपंढरी येथे तुलसी विवाह संपन्न

श्री सद्‌गुरू दादा महाराज
सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान,
कोल्हापूर

15/11/2024
कार्तिकी एकादशी
विश्वपंढरी येथे दिपोत्सव





श्री सद्‌गुरू दादा महाराज
सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान,
कोल्हापूर

15/11/2024
कार्तिकी एकादशी
श्री दादांच्या समाधी येथे दिपोत्सव

# श्री सद्‌गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर



श्री सद्‌गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

12/12/2024 ते 14/12/2024
श्री दत्तजयंती निमित्त
श्री गुरूचरित्राचे पारायण

श्री सद्‌गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

14/12/2024
श्री दत्तजयंती निमित्त
जन्मकाळ सोहळा व श्री दत्तयाग








श्री सद्‌गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

22/12/2024
कोल्हापूर पर्यटनास आलेल्या अंध मुलांना जेवण वाटप.

श्री सद्‌गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

28/12/2024
सोनारवाडी येथील दादांचे विश्रांतीस्थान येथे अभिषेक



# श्री सद्‌गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

श्री सद्‌गुरू दादा महाराज
सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान,
कोल्हापूर

26/01 /2025
श्री विश्वनाथ महाराज यांच्या
पादुकांची पुजा - उत्सव 2025





श्री सद्‌गुरू दादा महाराज
सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान,
कोल्हापूर

26/01/2025
श्री विश्वनाथ महाराज यांच्या
पादुकांची मिरवणूक - उत्सव 2025

श्री सद्‌गुरू दादा महाराज
सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान,
कोल्हापूर

26/01/2025
श्री विश्वनाथ महाराज यांच्या
पादुकांची मिरवणूक - उत्सव 2025





श्री सद्‌गुरू दादा महाराज
सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान,
कोल्हापूर

26/01/2025
श्री विश्वनाथ महाराज यांच्या
पादुकांची अभिषेक पूजा - उत्सव 2025

# श्री सद्गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर



श्री सद्गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

श्री विश्वनाथ महाराज रुकडीकर
पुण्यस्मरण सोहळा
प्रसाद वाटप



श्री सद्गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

31/01/2025
धर्मनाथ बीज पूजा

श्री सद्गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

01/02/2025
दिपोत्सव सोहळा-
उत्सव 2025





श्री सद्गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

21/02/2025
श्री कात्यादेवी मंदिरात
नवीन उत्सवमूर्ती अर्पण

# श्री सद्‌गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

श्री सद्‌गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

26/02/2025
महाशिवरात्र निमित्त अभिषेक व पूजा





श्री सद्‌गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

20/03/2025
श्री माधवनाथ महाराज यांच्या जयंती निमित्त अभिषेक व पूजा

श्री सद्‌गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

20/02/2025
श्री माधवनाथ महाराज यांच्या जयंती निमित्त जन्मकाळ सोहळा







श्री सद्‌गुरू दादा महाराज सांगवडेकर सेवा प्रतिष्ठान, कोल्हापूर

20/03/2025
श्री माधवनाथ महाराज यांच्या जयंती निमित्त अन्नदान

# श्री सद्‌गुरू विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर

**तत्कालीन मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे यांची विश्वपंढरीस सदिच्छा भेट ! सोबत इतर मा.मंत्री महोदय**










# श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर



श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर

03/05/2024

शासकीय विद्यालय, बारामती
व्हीलचेअर प्रदान

श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर

31/05/2024

पंचगंगा स्मशानभूमी,कोल्हापूर
येथे लाकडी कपाट व क्र.फलक प्रदान






श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर

21/06/2024

जिल्हापरिषद शाळा,बस्तवडे येथे
प्लॅस्टीक खुर्च्या प्रदान

श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर

05/08/2024

जिद्द मतिमंद शाळा,चिपळूण
आयुर्वेदिक तपासणी व उपचार शिबीर



# श्री सद्‌गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर

श्री सद्‌गुरु विश्वनाथ महाराज
रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर

06/08/2024

पांजरपोळ संस्था,कोल्हापूर
येथे आर्थिक मदत प्रदान





श्री सद्‌गुरु विश्वनाथ महाराज
रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर

06/08/2024

पांजरपोळ संस्था,कोल्हापूर येथे
भाकड जनावरांसाठी ओला चारा

श्री सद्‌गुरु विश्वनाथ महाराज
रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर

15/08/2024

भारतीय स्वातंत्र्य दिन निमित्त झेंडा वंदन
व सरिता कांबळे यांना घरबांधणी निमित्त आर्थिक मदत






# श्री सद्‌गुरू विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर



श्री सद्‌गुरू विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर

07/09/2024

ताराराणी विद्यालयातील विद्यार्थ्यांना स्टडी टेबल प्रदान

श्री सद्‌गुरू विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर

07/09/2024

सौ.साक्षी लोहार यांना घरबांधणीस मदत





श्री सद्‌गुरू विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर

07/09/2024

अहिल्याबाई सेंट्रल स्कूलला तीन ग्रीन बोर्ड प्रदान

श्री सद्‌गुरू विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर

20/09/2024 ते 22/09/2024

श्री विश्वव्याख्यानमाला आरोग्य एक्स्पो शुभारंभ



# श्री सद्गुरू विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर

श्री सद्गुरू विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर

21/09/2024

श्री विश्वव्याख्यानमाला शुभारंभ





श्री सद्गुरू विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर

28/10/2024 ते 30/10/2024

श्री विश्वयुवा व्याख्यान माला, ऑनलाईन स्वरुपात

श्री सद्गुरू विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर

28/10/2024 ते 30/10/2024

श्री विश्वयुवा व्याख्यान माला, ऑनलाईन स्वरुपात






श्री सद्गुरू विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर

26/01/2025

भारतीय प्रजासत्ताक दिन झेंडा वंदन

# श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर




श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर

30/01/2025

माऊली आनंदी पुरस्कार

श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर

31/01/2025

कोल्हापूर महानगर पालिकेस वॉटर प्युरीफायर प्रदान






श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर

20/03/2025

पंचगंगा स्मशानभूमीस 25,000 शेणीप्रदान

श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर

20/03/2025

सोल्जर इंडिपेन्डंट रिहॅबिलेशन संस्थेस आर्थिक मदत प्रदान





## बसन्त कुसुमाकर रस

स्वर्ण
मोती
अंबर
युक्त

स्वर्णभस्मयुक्त असल्याने ..........

- मधुमेहामुळे येणारा शारिरीक अशक्तपणा दूर करण्यात मदत करते..
- स्वर्णभस्म व मौल्यवान जडीबूटीच्या मिश्रणाने तयार हा योग अत्यंत शक्तिवर्धक व पौष्टिक आहे.
- विशेषतः 40 वर्षाच्यावर वयाच्या स्त्री–पुरुषांकरिता विशेष गुणकारी

**असाध्य रोगांत-रोगप्रतिकारक क्षमता वाढविण्यास सहायक.**



## अकाली म्हातारपण?

बैद्यनाथ स्वर्ण मकरध्वज अकाली येणारे म्हातारपण न येऊ देणारे उत्तम शक्तिवर्धक रसायन आहे. कमी वयात केस पिकणे, त्वचेवर सुरकुत्या येणे, डोळ्यांखाली काळे धब्बे येणे, त्वचा निस्तेज होणे. इ. विकारांना दूर करण्यास मदत करते. प्रतिकारक्षमता वाढविण्यास अत्यंत लाभदायक आहे. यात स्वर्ण भस्म असल्याने शारिरीक दुर्बलता दूर होऊन शरीराला स्वस्थ सुंदर व कांति युक्त बनविण्यास सहायक.

**बैद्यनाथ**

## सिध्द मकरध्वज टैबलेट (स्वर्णयुक्त)



स्वर्ण
मोती
युक्त

**बैद्यनाथ**

## वात चिन्तामणि रस (बृहत)

कठिण वात रोग दूर करून रोगप्रतिकारक्षमता वाढवण्यास मदत करते.

**बैद्यनाथ**

## सूतशेखर रस नं. 1 (स्वर्ण युक्त)



स्वर्ण
युक्त

- आम्लपित्त, उल्टी होणे, खोकला, अतिसार, पोट फुगणे, उचकी, भूक न लागणे, इत्यादीच्या चिकित्सेत उपयोगी.
- आम्लपित्तामुळे उत्पन्न त्रास, छातीत व गळयात आग होणे, आंबट ढेकर येणे, उल्टी होणे, डोळे दुखणे इत्यादी त्रास दूर करण्यात सहायक.
- शरीरात पित्त प्रकृपित झाल्याने उत्पन्न त्रास – हातपायाच्या तळव्यांमध्ये आग होणे, डोळयांची आग होणे इत्यादी दूर करण्यात सहायक.

# 'गुरुदत्त शुगर्स'चे आपत्तीतील पुण्यकर्म न विसरण्यासारखे '

## - मा. खा. शरदचंद्रजी पवार





महापूर
2005



2005 च्या महापुरामध्ये 'गुरुदत्त शुगर्स'ने कार्यस्थळावर तीन हजार पूरग्रस्त व 800 जनावरांना आधार दिला. गुरुदत्त परिवाराने पूरग्रस्तांना संकटकाळी केलेली मदत अनमोल आहे. त्यांचे हे मदतकार्य कौतुकास्पद असल्याचे खासदार शरदचंद्रजी पवार यांनी सांगितले. महापुरादरम्यान रेस्क्यू टीमला लागणारी सर्व प्रकारची मदत गुरुदत्त शुगर्सने केली. सर्व पूरग्रस्तांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी छावणीतच आरोग्य शिबिराचे आयोजन केले. गुरुदत्त परिवाराने सर्व पूरग्रस्तांची कुटुंबातील सदस्याप्रमाणे काळजी घेतल्याने पूर ओसरल्यानंतर घरी जात असताना पूरग्रस्तांचा कंठ दाटून आला.

# 'गुरुदत्त' चे महापुरातील मदतकार्य दीपस्तंभासारखे

## - मा. आम.चंद्रकांतदादा पाटील



महापूर
2019



ऑगस्ट 2019 मध्ये शिरोळ तालुक्याला परत एकदा महापुराचा मोठा फटका बसला. या वेळी 'गुरुदत्त शुगर्स'ने सर्व गावांतील 4000 पूरग्रस्त व 1000 जनावरांना निवारा देऊन त्यांचा आधारवड बनला. सर्व पूरग्रस्तांना दोन वेळचे जेवण व चहापाणी, तसेच त्यांच्या आरोग्याची काळजी घेतली. मुक्या जनावरांना पशुखाद्य व ओली वैरणही देण्यात आली. पूरग्रस्तांच्या मनातील दडपण दूर करण्यासाठी छावणीत देशभक्तिपर चित्रपट, भजन-कीर्तन तसेच आर्ट ऑफ लिव्हिंगसारख्या कार्यक्रमाचे आयोजन करून त्यांचे मनोबल वाढविण्याचा प्रयत्न केला.

महापूर
2021





# पुरग्रस्तांचे दुःख 'गुरुदत्त' मुळे हलके

## - मा. देवेंद्र फडणवीस साहेब

**पुरग्रस्तांची सावली, गुरुदत्त माऊली !**

2021 च्या महापुरात 'गुरुदत्त शुगर्स' पुन्हा पूरग्रस्तांच्या मदतीला धावून येऊन त्यांचा आधारवड बनला आहे. 'गुरुदत्त'ने 2005 व 2019 च्या महापुराच्या संकटात स्वखर्चाने पूरग्रस्त छावणी उभी केली होती. 2021 च्या महापुरातही 2000 पूरग्रस्तांना निवारा, भोजन तसेच 1000 जनावरांना निवारा, चारापाणी व औषधोपचाराची व्यवस्था केली आहे. शासकीय मदतीशिवाय पूरग्रस्तांचे अश्रू पुसण्याचे कार्य 'गुरुदत्त'चे चेअरमन **माधवराव घाटगे** व एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर **राहुल घाटगे** यांनी केले आहे.

सर्व पूरग्रस्तांना वेळेत 2 वेळचा चहा व जेवण देऊन त्यांच्या आरोग्याचीही काळजी घेण्यात आली. जनावरांसाठी स्वमालकीच्या 35 एकर क्षेत्रातील ऊस, तसेच पशुखाद्य व पशुवैद्यकीय सुविधा नेटकेपणाने केली. कोरोना संकटकाळात सर्वांची कोरोना तपासणी करून त्यांना वैद्यकीय सुविधाही उपलब्ध करून दिल्या. नैसर्गिक आपत्ती वा इतर सामाजिक कार्य व 'गुरुदत्त शुगर्स' हे परिसरात समीकरण बनले आहे. पूर ओसरल्यावर घरी परत जाताना सर्व पूरग्रस्तांच्या डोळ्यांतून अश्रू येऊन 'गुरुदत्त' हाच आमचा खरा आधारवड असल्याच्या भावना व्यक्त झाल्या.







संस्थापक
स्व. भगवानराव घाटगे

SGSL

# श्री गुरुदत्त शुगर्स लि.

टाकळीवाडी, ता. शिरोळ जि. कोल्हापूर



मा. श्री. माधवराव घाटगे
चेअरमन व कार्यकारी संचालक

www.sgslt.com 0231-2686086


धूतपापेश्वर
आयुर्वेद श्रेष्ठता के १५० से अधिक वर्ष
१५० वर्षों से अधिक
या गरमी चा
प्राकृतिक इलाज!
शीतसुधा®
गरमी पासून सुटका
व शीतलता
नैसर्गिक वाळ्यापासून निर्मित
Sheeta Sudha
शीतसुधा
Cooling & Refreshing
उपलब्धता: 480 मि.ली.
गोडवा आरोग्याचा
अनुभव थंडाव्याचा
गुलकंद
Gulkand
प्रवाळ आणि मौक्तिक युक्त
Gulkand
गुलकंद
Fortified with Pravala & Mouktik
शुद्ध राशि: 200 ग्रॅम, 400 ग्रॅम, 900 ग्रॅम
F25SS/GKAd 7.5 X 7.5H433
श्री धूतपापेश्वर लिमिटेड | शास्त्रोक्त, मानकीकृत, सुरक्षित आयुर्वेद औषधे
Mfd. by: OM PHARMACEUTICALS LTD., 12th Mile, Old Madras Rd., Bengaluru-560049, INDIA. Mfd. & Mktd. by (TM Owner)
& Office of Consumer Care Desk: SHREE DHOOTAPAPESHWAR LTD., 135, Nanubhai Desai Rd., Khetwadi, Mumbai-400004, Tel.: +91-22-23829874
(Mon to Fri from 10 am to 5 pm, except holidays), E-mail: healthcare@sdlindia.com

## निरंतर सेवाकार्य

# श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व रिसर्च सेंटर, कोल्हापूर

२१/०६/२०२३

आषाढी वारी हे आपल्या विश्वपंढरी समूहाच्या अध्यात्मिक कार्यांपैकी एक. गेली २७ वर्ष विश्वपंढरी समूह 'सुगंधी दिंडी' आयोजित करत आला आहे. या दिंडीमध्येवारीमार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व रिसर्च सेंटर मार्फत आयुर्वेदिक तपासणी व उपचार शिबीर आयोजित करण्यात येते.जेष्ठ साहित्यक, श्री सुभाष कवडे सर यांच्या हस्ते वारी मार्गावरील भिलवडी येथील सेवाभावी आयुर्वेदिक शिबिराचे उद्‌घाटन झाले.

२३/०६/२०२३

दिंडीमध्ये वारीमार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी श्री विश्ववती आयुर्वे दिक चिकित्सालय व रिसर्च सेंटर मार्फत आयुर्वेदिक तपासणी व उपचार शिबीर आयोजित करण्यात येते. माननीय खासदार संजय काका पाटील यांच्या हस्ते चिंचणी येथील शिबिराचे उद्‌घाटन करण्यात आले

११/१२/२०२३

श्री संत ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी उत्सव निमित्ताने श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान, आळंदी (देवाची), पुणे यांच्या सहकार्याने प.पू. श्री सदगुरू विश्वनाथ महाराज रूकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर व श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व रिसर्च सेंटर, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय सेवाभावी आयुर्वेदीय उपचार शिबिर आळंदी येथे संपन्न झाले.

शिबीर शुक्रवार दि ८, ते रविवार दि. १० डिसेंबर २०२३ या तीन दिवसात, प्रसादालय भक्त निवास व इंद्रायणी घाट आळंदी या दोन ठिकाणी घेण्यात आले.

पहिल्या दिवशी योगी श्री निरंजनाथ महाराज, विश्वस्त श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदी यांच्या हस्ते या तीन दिवसीय सेवाभावी आळंदी शिबीराचे उदघाटन व प्रतिमा पूजन करण्यात आले व ट्रस्टच्या वतीने त्यांचा सत्कार वैद्य प्रविण पाटील यांनी केला. तसेच पंढरपूर येथील नामदेव महाराजांचे वंशज श्री हरी नामदास

महाराज यांनी आळंदी सेवा शिबिराला सदिच्छा भेट दिली व ट्रस्टच्या वतीने त्यांचा सत्कार वैद्य सचिन म्हैसणे यांनी केला.

तीन दिवसीय शिबिरात संपूर्ण महाराष्ट्र व कर्नाटक येथील एकूण ४,२९१ वारकऱ्यांनी सेवाभावी शिबिराचा लाभ घेतला, मोफत औषधी उपचार तसेच तात्काळ आराम मिळावा म्हणून निर्वात चिकित्सा, अग्नीकर्म, विद्ध कर्म असे स्थानिक स्नेहन / अभ्यंग करण्यात आले.

सर्व रुग्णांना त्यांच्या राहत्या ठिकाणापासून रुग्णांना जेथे जवळ असेल अशा ट्रस्ट संचलित संपूर्ण महाराष्ट्रात सुरु असलेल्या विविध ठिकाणच्या सेवाभावी आयुर्वेदीय शिबिरात पुढील उपचारासाठी येण्याचे आवाहन प.पू. श्री सदगुरू विश्वनाथ महाराज रूकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर यांच्या वतीने करण्यात आले. ह्या सेवाभावी शिबिरासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून एकूण २३० सेवेकरी वैद्यांनी सेवा दिली, यात साधारण १०० पेक्षा जास्त आयुर्वेदिक वैद्य व आयुर्वेदाच्या विविध शाखेतील १३० विद्यार्थी सेवेत सहभागी झाले, प्रामुख्याने प्रसादलाय भक्त निवास – येथील सेवेत सर्वांचाच सहभाग होता व इंद्रायणी घाटावरील सेवा वैद्य शुभम धूत व त्यांच्या सहकार्यांनी दिली

शिबिराचा समारोप – योगी श्री निरंजनाथ महाराज –विश्वस्त श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदी यांच्या हस्ते, शिबिरात सेवा देणार्या सर्व वैद्य व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन समारोप करण्यात आला, त्या वेळी वैद्य महेश पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.

श्री संत ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी उत्सव निमित्ताने तीन दिवसीय आयुर्वेदिक सेवाभावी शिबीरात एकूण ४,२९१ रुंग्णांनी लाभ घेतला
प.पू. श्री सदगुरू विश्वनाथ महाराज रूकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर व श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व रिसर्च सेंटर यांच्या वतीने घेण्यात असलेल्या ह्या तीन दिवसीय शिबिरात श्री विश्वामृत व श्री विश्वानंद चिकित्सालयातील सर्व विद्यार्थी वैद्य यांनी औषधी पॅकिंग करून अनमोल सेवा दिली तसेच महाराष्ट्रातून आलेले सर्वच वैद्य व विदयार्थी तसेच श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदी या ट्रस्ट चे अनमोल सहकार्य लाभले.

पायी चालत आलेले, ८ ते १० तास दर्शनबारीत थांबलेल्या तसेच इतर जे जे उपचारासाठी आलेल्या सर्वच रुग्णांना, उपचार देतांना वैद्याला होणारे समाधान हे अनन्य साधारण असते, याची प्रचिती सर्व सेवेकऱ्यांना आली
माऊली म्हणतात

जे जे भेटे भुतं ते ते मानीजे भगवंत । हा भक्ती योग निश्चित जाण माझा।।

ह्या माऊलींच्या ओवी प्रमाणे ह्या भक्तिच्या महापुरात सेवा देतांना सर्वांनाच आनंद झाला.

२६/०१/२०२५

मुनिंद्र श्री सद्‌गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर यांच्या १०६ व्या पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व श्री सद्‌गुरु विश्वनाथ महाराज रूकडीकर ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने सात दिवसांचे आयुर्वेदिक महाआरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्‌घाटन श्री आनंदनाथ महाराज व राज्य नियोजन महामंडळाचे अध्यक्ष आणि कोल्हापूर उत्तर चे आमदार यांच्या हस्ते संपन्न झाले. चिकित्सालयाचे अध्यक्ष श्री निरंजनदास सांगवडेकर व सौ ऋचा सांगवडेकर उपस्थित होते.

या आयुर्वेदिक महाआरोग्य शिबिरात सात दिवसांमध्ये विविध आजारांवरती मोफत तपासणी व पन्नास टक्के शुल्कामध्ये उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आली . या शिबिराचा सर्व नागरिकांनी लाभ

२८/०१/२०२५

मुनींद्र श्री सद्‌गुरु विश्वनाथ महाराज यांच्या १०६ व्या पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त श्री सद्‌गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर व जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय मोफत आयुर्वेदिक आरोग्य तपासणी शिबिराची सुरुवात श्री केळकर महाराज यांच्या हस्ते सुरवात झाली. या तपासणी शिबिरात दरम्यान करवीर तालुक्यामधीक्य बालकांसाठी मोदामृत पोषण आहार अंतर्गत तपासणी व उपचार व ग्रामीण पर्यवेक्षिका तसेच अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या प्राथमिक आयुर्वेदिक मोफत तपासणी तसेच आयुर्वेदिक उपचार करण्यात आले . यावेळी जिल्हा परिषद च्या वतीने सौ. अनुपमा सुतार, तसेच ग्रामीण पर्यवेक्षिका तसेच अंगणवाडी सेविका व मदतनीस उपस्थित होत्या.

०८/०३/२०२४

या देवी सर्वभूतेषु शक्तिरूपेण संस्थिता ।
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः

८ मार्च जागतिक महिला दिन...!

जागतिक महिला दिनानिमित्त श्री विश्ववती आयुर्वेदिक

चिकित्सालय व रिसर्च सेंटरच्या वैद्य सौ. ऋचा सांगवडेकर यांच्या संकल्पनेतून विश्वपंढरी समूहातील सर्व संस्थांमध्ये कार्यरत असणाऱ्या सर्व महिलांची रक्त तपासणी व बॉडी कंपोझिशन इंडेक्स तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष श्री आनंदनाथ सांगवडेकर, श्री विश्ववती चिकित्सालायचे अध्यक्ष श्री निरंजन सांगवडेकर, ट्रस्टच्या विश्वस्त सौ विश्वा सांगवडेकर, प्रतिष्ठानच्या अध्यक्षा संगीता सांगवडेकर, वैद्य सौ. ऋचा सांगावडेकर, चिकित्सालयाच्या वैद्य महिला, योग प्रशिक्षक प्राजक्ता सांगवडेकर, योगप्रशिक्षिका आणि इतर महिला कर्मचारी वर्ग उपस्थित होत्या.यावेळी सर्व महिला वर्गास छोटी भेटवस्तू देण्यात आल्या


॥ ॐ॥ श्री ॥ॐ॥


श्री विश्वगंध आयुर्वेद पंचकर्म हॉस्पिटल, संगमनेर

उपलब्ध सुविधा

ह्रदयाचे रक्तवाहिन्यांचे आजार | दमा | जूनाट सर्दि | सोरीयासिस | त्वचाविकार | मणक्याचे आजार | आम्लपित्त | आव व पोटाच्या तक्रारी | मुळव्याध व भगंदर | सधिवात, आमवात | मुतखडा | उंची वाढीसाठी

वैद्य अतुल देशमुख
(आयुर्वेदाचार्य, योग आयुर्वेद पदविका, पुणे)

वैद्य स्मिता देशमुख
(आयुर्वेदाचार्य, पंचकर्म तज्ञ, पुणे)



हितगुज वर Live २४ तास मुलाखत
झी-२४ तास हितगुज वर लाईव्ह
प्रत्येक २ रा शुक्रवार
दुपारी २.३० ते ३.०० वा.

tv9 मराठी
आरोग्यम धनसंपदा मध्ये
प्रत्येक दुसऱ्या बुधवारी
दुपारी ३.३० ते ०४.००

अधिक माहितीसाठी भेट द्या
www.vishwagandhaayurved.com

मुलाखतीचे संपूर्ण व्हिडीओ यु-ट्युब व फेसबुकवर उपलब्ध



- अंतररुग्ण चिकित्सा
- स्वनिर्मित औषधी
- शास्त्रशुध्द पंचकर्म
- इतर सर्व आजारांसाठी शास्त्रशुध्द आयुर्वेद उपचार उपलब्ध.

नविन नगर रोड, गंगाई मार्ग, पाठक हॉस्पिटल समोर, संगमनेर, जि. अ.नगर मो. 9822283079, (02425) 221635



With Best Compliments From,

**Quick Heal Technologies Pvt. Ltd.**

# श्री क्षेत्र शिर्डी

## सेवाभावी आयुर्वेदिक तपासणी व उपचार शिबीर

- वैद्य सचिन सातपुते.

श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट,कोल्हापूर आयोजित व श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व रिसर्च सेंटर यांच्या सहकार्याने संपूर्ण महाराष्ट्रात विविध ठिकाणी सेवाभावी आयुर्वेदिक शिबीर आयोजित करण्यात येते.

यापैकी श्रीक्षेत्र शिर्डी येथे द्वारकामाई या स्थानिक ठिकाणासमोर आपले सेवाभावी आयुर्वेदिक शिबीर संपन्न होत असते. दर महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी सकाळी ९.३० ते २.०० हा या शिबीराचा कालावधी असून दर महिन्याला साधारण २१० ते २५० रुग्ण या शिबीराचा लाभ घेतात. वर्षभरात २५०० ते ३००० व्यक्ती या शिबिरातून आयुर्वेदिक उपचार व तपासणी करुन घेतात.सध्या या शिबीराचे प्रमुख वैद्य सचिन सातपुते असून वैद्य अतुल देशमुख, वैद्य मनोज कुलकर्णी, वैद्य वाजीद शेख, वैद्य विराज कदम, वैद्य यशवंत निब्रड, वैद्य मुकुंद चंदिले व आयुर्वेद अभ्यासक्रमाचे नव-विद्यार्थी उपस्थित असतात.

# श्री क्षेत्र पंढरपूर

## सेवाभावी आयुर्वेदिक तपासणी व उपचार शिबीर

- वैद्य अरविंद पांढरे.- कौस्तुभ देशपांडे.

श्रीक्षेत्र पंढरपूर, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या संत नामदेव पायरी येथे श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट,कोल्हापूर आयोजित व श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व रिसर्च सेंटर यांच्या सहकार्याने आपले सेवाभावी आयुर्वेदिक शिबीर संपन्न होत असते. दर महिन्याच्या कृष्ण एकादशीस स.९.३० ते सायं.५.०० हा या शिबीराचा कालावधी असून या एकादशीला साधारण १८० ते २०० रुग्ण या शिबीराचा लाभ घेतात. वर्षभरात २००० ते २५०० व्यक्ती या शिबिरातून आयुर्वेदिक उपचार व तपासणी करुन घेतात.

सध्या या शिबीराचे प्रमुख वैद्य अरविंद पांढरे असून सर्वश्री वैद्य अमोल मोरे, सौ स्वाती अमोल मोरे, विवेकानंद पाटील, निळकंठ उमरदंड, बाळासाहेब शेवाळे, राहुल लवटे, सुनील लवटे, आशुतोष तोडकरी, सौ आशुतोष तोडकरी, आबा रणदिवे, सौ अमृता आबा रणदिवे, गणेश माळी, अभिजीत पुजारी, सौ कुरडे मॅडम, सचिन कुलकर्णी, कैलास नरळे, सौ कुंभारे मॅडम, तुषार पवार, व विश्वपंढरीचे पंढरपूर येथील साधक श्री कौस्तुभ देशपांडे उपस्थित असतात.

# श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर

## सेवाभावी आयुर्वेदिक तपासणी व उपचार शिबीर

- वैद्य तुषार निकम.

भारतातील कुंभमेळा भरणारे आणि महाराष्ट्रातील एकमेव ठिकाण म्हणजे नाशिक. नाशिक मधील पंचवटी आणि त्र्यंबकेश्वर या ठिकाणी कुंभमेळा चे आयोजन होते यापैकी त्रंबकेश्वर या ठिकाणी परमपूज्य सद्गुरु निवृत्तीनाथ महाराज यांचे समाधी स्थान आहे ज्या ठिकाणी मागील सोळा वर्षांपासून महिन्यातील दोनही एकादशीला श्री विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर यांच्याद्वारे मोफत आयुर्वेदिक सेवा शिबिर घेण्यात येते.

प.पू. सद्गुरु श्री आनंदनाथ महाराज यांच्या आणि आदरणीय गुरुवर्य वैद्य श्री जमदग्नी सर यांच्या मार्गदर्शनामुळे नाशिक येथील वैद्य हे सेवा शिबिर अविरत चालवत आहे.यामध्ये रुग्णांची तपासणी औषधी उपचार पूर्णपणे मोफत करण्यात येतात सोबतच स्नेहन स्वेदन अग्निकर्म विद्ध कर्म रक्त मोक्षण करण्यात येते. तसेच मर्मचिकित्सा आणि परमपूज्य महाराज यांच्या कृपाआशीर्वादाने सिद्ध झालेले विशेष स्वरूपाचे नेत्र ड्रॉप्स चिकित्सा देखील करण्यात येते.

पूर्ण वर्षभरात या शिबिराचा लाभ साधारणपणे ९ ते १० हजार रुग्णांना होतो, याचा साधारणपणे खर्च ५ते ६लाख रु. असतो जो पूर्णपणे कोल्हापूर येथील ट्रस्ट द्वारे करण्यात येतो.पौष महिन्यात प.पु.निवृत्तीनाथ महाराज यांच्या यात्रेदरम्यान चार ते पाच हजार रुग्णांना मोफत औषधी उपचार करण्यात येते.यामध्ये अनेकानेक उत्तम अनुभव येतात.

या शिबिरात लासलगाव येथील शेतकरी आले होते ज्यांना अर्धांगवायु चा झटका आलेला होता, ज्यामुळे त्यांचे चालणे आणि बोलणे नीट होत नव्हते चेहरा पण बराच वाकडा झाला होता, मात्र २-३महिन्याच्या नियमित औषध-उपचाराने त्यांचे बोलणे, चालणे यात खूप च फरक पडला,चेहरा पण पूर्ववत झालाय.फ्रोझन शोल्डर असणारे एक गृहस्थ नियमित औषध आणि सांगतलेले पथ्य पाळल्यामुळे चांगले झालेच शिवाय त्यांची शुगर देखिल प्रमाणात राहिला लागली.असे अनेक अनुभव येथील रुग्णांना कायम मिळतात, नाशिक मधील १० ते १२ वैद्य आणि १५ ते २० विद्यार्थी या शिबिरात नियमित येत असतात.

यामध्ये वैद्य संदीप पाटील सर, वैद्य सागर पाटील, वैद्य अक्षय झिटे,

वैद्य अमोल साळुंखे, वैद्य ज्ञानेश वाघ, वैद्य जीवन जाधव, वैद्य तुषार निकम, वैद्य ऋषिकेश कोल्हे, वैद्य मोहित चौधरी,वैद्य प्रज्योत सुर्यवंशी आणि इतर विद्यार्थी नियमित सेवा देत असतात.

हे मजचिस्तव जाहले । परी म्या नाही केले ।
ऐसे जेणे जाणितले । तो सुटला गा ।।

असाच भाव आम्हा सर्वांचा कायम रहावा हीच सद्गुरू कडे नम्र प्रार्थना. सद्गुरु कृपेने सर्वांची सेवा नित्य राहावी हीच नम्र विनंती.

# श्री क्षेत्र नर्सी नामदेव

## सेवाभावी आयुर्वेदिक तपासणी व उपचार शिबीर

- वैद्य अमोल हिंगमिरे.

श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर आयोजित व श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व रिसर्च सेंटर यांच्या सहकार्याने श्री संत श्री नामदेव महाराज, नर्शी नामदेव, ता.जिल्हा हिंगोली,महाराष्ट्र ठिकाणी सेवाभावी आयुर्वेदिक शिबीर आयोजित करण्यात येते.

प्रत्येक महिन्याच्या भागवत एकादशीला श्री नामदेव महाराज यांच्या मंदिराशेजारी असणाऱ्या सभामंडपात सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत संपन्न होते.

सदर शिबीरात दर महिन्याला १८० ते२०० रुग्ण येतात. या वर्षभरात १५०० ते २००० रुग्णांनी या शिबीरातील आयुर्वेदिक तपासणी व उपचार सेवेचा लाभ घेतला आहे.

या शिबीर कामी प. पू . श्री नामदेव महाराज संस्थान चे अध्यक्ष व इतर सदस्य यांचे मोलाचे सहकार्य लाभत असते.

वैद्य श्री अमोल हिंगमिरे हे सध्या शिबीर प्रमुख म्हणून काम पहात आहेत तर वैद्य गजानन साखरे, वैद्य अशोक देशमुख, वैद्य स्वप्नील दुद्दलवार, वैद्य स्वप्नील सावके, वैद्य अमोल दरगु, वैद्य वैशाली शिंदे, वैद्य पल्लवी शिंदे, वैद्य तुषार देशमुख, वैद्य महेश इगडे इ.वैद्य प्रत्येक शिबीरामध्ये सेवा देण्यास येतात.

# श्री क्षेत्र वडाळा,मुंबई

## सेवाभावी आयुर्वेदिक तपासणी व उपचार शिबीर

- वैद्य. वैभव जोशी.

### रुग्णसेवेचा सद्गुरु संकल्प-
### श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर (प्रतिपंढरपूर),मुंबई शिबिर

खरंच!! सद्गुरुंचे संकल्प हे स्वयंसिद्ध आणि समाजोपयोगीच असतात. कोरोना काळानंतर जेव्हा जनमानसांना आरोग्याविषयी उपचारांची नितांत गरज होती तेव्हा परमपूज्य सद्गुरु श्री आनंदनाथ महाराज यांच्या प्रेरणेने आणि मार्गदर्शनाने गेल्या ३ वर्षापासून श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर ट्रस्ट, वडाळा, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमानाने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर (प्रतिपंढरपूर),मुंबई येथे आपल्या ट्रस्टमार्फत मोफत आयुर्वेदिक उपचार शिबिर सुरू झाले.

दर महिन्याच्या कृष्ण एकादशीला (भागवत),असे महिन्यातून एक वेळा हे शिबिर भरविले जाते. सकाळी ९वा.ते दुपारी ३ वाजेपर्यंत शिबिर सुरू असते. या काळात आसपासच्या भागातील सुमारे २२५ ते २५० रुग्ण या शिबिराचा लाभ घेतात. या शिबिरातील सेवेसाठी मुंबई विभागातील वैद्य. अमोल भेरे, वैद्य. दीपक केसरकर, वैद्य प्रीतम चौगुले,वैद्य सुधा लोखंडे, वैद्य प्रतिभा सोनावणे, वैद्य प्रणील ठाकरे, वैद्य दीप्ती नेने, वैद्य संतोष देशमुख, वैद्य आदिती भोईर, वैद्य वैभव जोशी यांचे उत्तम सहकार्य लाभते.

सद्गुरु कृपेने येथे औषध घेणाऱ्या बऱ्यापैकी रुग्णांना चांगला गुण येतो. कित्येक रुग्णांची ॲलोपथी औषधे बंद झाली आहेत, कित्येकांची ऑपरेशन्स टळली आहेत, कित्येकांची पंढरपूरची वारी, गिरनार परिक्रमा, नर्मदा परिक्रमा इत्यादी सूप्त मनोकामना ज्या शारीरिक आजारामुळे अवघड वाटत होत्या त्यादेखील पूर्ण झाल्याचे रुग्णांनीच नंतर सांगितले आहे. आजाराने पीडित जे का रंजले गांजले....त्यांच्यासाठी सद्गुरु आनंदनाथ महाराजांनी शिबिरातील सर्व औषधे ही गोळ्या स्वरूपात उपलब्ध करून दिली आहेत. त्याबद्दल वैद्यांसह अनेक रुग्ण देखील त्यांचे आभारी आहेत.

दरवर्षी शिबिरातील लाभार्थ्यांची संख्या ही वाढतच आहे.२०२४-२५ या वर्षात साधारण २५०० रुग्णांनी या सेवेचा लाभ घेतला आहे. रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा या उक्तीप्रमाणे सद्गुरु ही सेवा आम्हा सर्वांकडून कायम करूवून घेवो..ही त्यांच्या चरणी प्रार्थना...

# श्री क्षेत्र पारडसिंगा, नागपूर

## सेवाभावी आयुर्वेदिक तपासणी व उपचार शिबीर

- वैद्य अमोल भंडारवार.

श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर आयोजित व श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व रिसर्च सेंटर यांच्या सहकार्याने तसेच सती अनुसया माता मंदिर ट्रस्ट पारडशिंगा यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित सेवाभावी आयुर्वेदिक उपचार व तपासणी शिबीर संपन्न होते.

सदरचे शिबीर प्रत्येक महिन्याच्या पौर्णिमेला श्री क्षेत्र पारडशिंगा काटोल तालुका, नागपूर येथे स.१० ते संध्या. ४ या वेळेत सती अनुसया माता मंदिरच्या हॉल मध्ये होते.

सदर शिबिरामध्ये दर महिन्याला येणाऱ्या रुग्णांची संख्या ७०० इतकी आहे. तर वर्षभरात ८४०० ते ९००० इतके रुग्ण या शिबिराचा लाभ घेतात.

शिबिर प्रमुख म्हणून वैद्य अमोल भंडारवार , सहवैद्य म्हणून वैद्य कपिल पेशने, वैद्य निलेश चुटे, वैद्य आनंद चामट, वैद्य पीयूष वानखेडे, वैद्य ईश्वर पाठराबे, वैद्य अनिल देशमुख , वैद्य वैभव चौधरी, वैद्य पंकज जोगी, वैद्य गौरव शेंडे, वैद्य कुंदन वासनिक, वैद्य कौस्तुभ पाटील, वैद्य मुक्तिका गावंडे, वैद्य शिल्पा भंडारवार, वैद्य रुचिता उघाडे, वैद्य रजनी हटवार, वैद्य श्रद्धा दुबे



प.पू.दादा तथा माधवनाथ महाराज

प्रभो आम्हा एकचि वर द्यावा..
जन्मोजन्मी या दासांना चरणांशी ठेवा !

पुरवंत आणि परिवार, पुणे.
संपर्क - ९३७१०६१५८९

# श्री क्षेत्र आळंदी,पुणे

## सेवाभावी आयुर्वेदिक तपासणी व उपचार शिबीर

- वैद्य. प्रवीण पाटील.

सद्गुरु श्री विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट व विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय कोल्हापूर यांच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रभर सुरु असलेल्या सेवाभावी शिबीरा प्रमाणे आळंदी येथे श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदी यांचा अनमोल सहकार्याने, अनेक वर्षापासून सेवाभावी शिबीर नियमितपणे सुरु आहे.

तरी तनुमनुजीवें । चरणासी लागावें ।
आणि अगर्वता करावें । दास्य सकळ ।।
(श्री ज्ञानेश्वरी ४ / १६७ )

श्री संत ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी मंदिर आळंदी (देवाची),पुणे येथे दर महिन्याच्या प्रत्येक एकादशीला भक्त निवास प्रसादालय आळंदी येथे शिबीर होत असते. सेवेसाठी येणारा प्रत्येक वैद्य हा वरील माऊलीचा ओवी प्रमाणे सेवा देत असतो. प्रत्येक वैद्य वा विदयार्थी हा आपली प्रॅक्टिस सोडून सेवेला येतो, निष्काम सेवाभाव असला कि सेवा चांगली होते व त्यातून आनंद मिळतो,

आळंदी येथे असंख्य वारकरी संपूर्ण महाराष्ट्र व कर्नाटक येथून माऊलींच्या दर्शनासाठी येतात, त्यातून अनेक रुग्ण शिबिरात उपचारासाठी येत असतात, रुग्ण दर महिन्याला उपचार घेऊन जातात व बरे झाले कि दुसऱ्या रुग्णांना ही उपचारासाठी घेऊन येतात, खुप रुग्णांना चांगला फरक पडतांना दिसतो आहे, बऱ्याच रुग्णांना ५ ते ६ वर्षा पासून विविध जुनाट आजारांनी ग्रस्त झालेला असतो, जसे कि वाताचे आजर, त्यात फ्रोझन शोल्डर यात हात वरती करता येत नाही, तसेच कंबर दुखी, मान दुखी, Spondylitis, गुडघा दुखणे, सायटीका, हातपाय लुडा पडणे ई आजारांसाठी पोटातून दिलेली औषधी व विद्ध कर्म, अग्नी कर्म तसेच कपिंग थेरपी ई मुळे खूप चांगला आराम मिळत आहे, ज्या रुग्णांना हात वर करता येत नव्हते ते सहज हात वर करता येऊ लागले आहेत, ज्यांना चालता येत नव्हते ते चालायला लागले आहेत, स्रियांचे आजार, लहान मुलांचे आजार, वाताचे आजर, पित्ताचे व पोटाचे सर्व आजर, जुनाट सर्दी खोकला, दमा, त्वचा विकार, लहान मुलांचे आजार, मतीमंद, उंची कमी असणे अशा सर्वच रुग्णांना चांगला आराम मिळतो आहे, असे अनेक रुग्णांना अनुभव आलेला आहे, व सद्गुरु कृपेने निरंतर येत राहील, तसेच अनेक रुग्ण कॅन्सर साठी ही आयुर्वेदिक उपचार घेता आहे, त्यानां आधुनिक उपचारा सोबत आयुर्वेदिक

उपचारही घेण्यासाठी सांगितले जाते. संतती प्राप्ती साठी ही अनेकांना उपयोगी होत आहे, सर्व आजारांसाठी अनेक  रुग्णांना अनुभव येत आहेत

रुग्ण अनुभव

महिला रुग्ण भोसरी पुणे येथील होती,  तिचे लग्न होवून बरेच वर्ष झाले होते, ती दर एकादशीली माऊली मंदिरात पिपंळाला प्रदक्षिणा घालत असे, ती एके दिवशी शिबिरात इतर आजारासाठी आली असता तिला विचारले संतती काही आहे का ? तर ती म्हणाली मला अजून संतती नाही, तिला विचारले कि तुम्हाला संतती प्राप्ती साठी औषधी देऊ का ? तर तिला आनंद झाला, ती औषधी द्या म्हणून हो म्हणाली, मग तीला व तीच्या नवऱ्याला ही औषधी दिली, फक्त २ महिन्यात औषधी उपचाराने माऊलींचा कृपेने तीला दिवस राहिले, त्या नंतर तिने गर्भ संस्कारा साठी पूर्ण ९ महिने औषधी घेतली, नंतर तीला मुलगा झाला, अशा अनेकांना आळंदी शिबिरात संतती साठी यश येत आहे, खरे तर येणारा प्रयेक रुग्ण माऊलीं ना दर्शन घेतांना मला बरे कर म्हणून प्रार्थना करत असेल, म्हणून तर आपल्याला सद्‌गुरु श्री माऊलीं ची रुग्ण सेवेची इच्छा,  आपल्या सद्‌गुरु श्री दादा महाराज व आनंदनाथ महाराजांनी पूर्ण करावी हिच खरी सद्‌गुरु सेवा  म्हणून पूर्ण महाराष्ट्रभर विविध ठिकाणी सेवाभावी शिबीर सुरु आहेत असे वाटते.

थायरॉईड ची महिला रुग्ण वय ३६ वर्षे , बरेच महिने आधुनिक उपचार घेत होती तरी तिचे थायरॉईड रिपोर्ट मध्ये फारसा फरक दिसत नव्हता, तर हया रुग्णाला आपली आळंदी येथील शिबिरातील औषधी सोबत श्री विश्ववती चिकित्सालय कोल्हापूर यांची सम्यक वटी दिली असता पुढील महिन्यातच तिचे रिपोर्ट पूर्ण पणे नॉर्मल आले, यामुळे रुग्ण खूप आनंदीत झाली व स्वत:हुन तिने रिपोर्ट आम्हाला दाखविले, असे अनेक रुग्णांना चांगले अनुभव येत आहेत.

# आळंदी शिबिराच्या वतीने विविध दिन विशेष शिबीर सेवा

श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी दिन निमित्त तीन दिवशीय सेवाभावी शिबीर दर वर्षी होत असते, तसेच आळंदी सेवाभावी शिबिराचा वतीने  दर वर्षी श्री संत सोपानकाका संजीवन समाधी उत्सव निमित्ताने सासवड येथेही रुग्ण सेवा दिली जाते व तेथील सर्व रुग्णांना आळंदी येतील शिबिरात पुढील उपचारासाठी बोलविले जाते.

या वर्षी विशेष म्हणजे श्री संत ज्ञानेश्वर माऊली आषाढी वारी प्रस्थान निमित्ताने दोन दिवसीय शिबीर घेण्यात आले.रुग्ण सेवा हीच सद्गुरु सेवा हे व्रत बाळगून सर्व वैद्य नियमितपणे सेवा देत आहेत.सद्गुरुंनी अशीच निरंतर निष्काम सेवा आम्हा सर्वांकडून करून घ्यावी हिच प्रार्थना. प्रत्येक महिन्यात दोन्ही एकादशीला आळंदी येथे सेवा असते व प्रत्येक एकादशीला साधारण ३०० रुग्ण व महिन्यात साधारण ६०० पेक्षा जास्त रुग्ण मोफत औषधी उपचार घेतात.वर्षभरात एकूण १०,५०६ रुग्णांनी मोफत औषधी उपचाराचा लाभ घेतला त्यात प्रामुख्याने कार्तिकी एकादशी निमित्त संत श्री ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी येथे तीन दिवशीय शिबीर मोफत औषधी उपचार शिबीरातील रुग्ण संख्या २४४१ इतकी होती.संत सोपानकाका समाधी दिनानिमित्त आयोजित शिबीरातील रुग्ण संख्या ३५३ इतकी होती.श्री संत ज्ञानेश्वर माऊली आषाढी वारी प्रस्थान निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय शिबीर रुग्ण संख्या ११५० इतकी होती.

अशा प्रकारे आळंदी सेवाभावी शिबिरात वर्षभरात एकूण १०,५०६ रुग्णणांनी मोफत औषधी उपचाराचा लाभ घेतला. या सोबत तात्काळ आराम मिळावा म्हणून विविध कर्म जसे की स्नेहन, अग्नी कर्म, विद्ध कर्म, निर्वात चिकित्सा, रक्त मोक्षण इत्यादी अनेक रुग्णांना उपचार करण्यात आले, यांची संख्या ही खुप मोठया प्रमाणात आहे.

यात काही औषधी जसे सुवर्ण सूतशेखर व आदेशमधू सारखी सुवर्ण कल्प ही आहेत,जी खुप मोठ्या प्रमाणात वापरली जातात शिबीर प्रमुख म्हणून वैद्य प्रविण पाटील व वैद्य अनंत सांगडे हे काम पाहतात. शिबीरास कायम उपस्थित असणाऱ्या सह वैद्याची नावे - वैद्य गणेश वाकळे, वैद्य गणेश ढोले, श्री अविनाश रेंगे, वैद्य आश्विनी शेटे, वैद्य आरती तिजारे, वैद्य प्राची कारीमुंगी, वैद्य महेंद्र चव्हाण, डॉ मयुरी पवार,वैद्य सुवर्णा मुंडे

आळंदी शिबिराला इतर अनमोल सहकार्य लाभलेले वैद्य सुजीत रांजणे, वैद्य भारत गायकवाड, वैद्य अभिजित शेटे, वैद्य महेश भोर, वैद्य  विकास शेटे, वैद्य चेतन महाजन, वैद्य संदीप आवटे

तचेच वर्षभरात अधून मधून सेवा देणारे अनेक सेवेकरी सेवा देतात, या सर्वांच्या सहकार्याने, विशेष म्हणजे नियमित सेवा देणारे सेवेकरी व श्री सद्गुरु कृपेने आळंदी सेवा नियमित सुरु आहे, अशीच निष्काम सेवा आम्हा सर्वाकडून होत राहावी हिच श्री सद्गुरु ज्ञानेश्वर माऊली चरणी प्रार्थना

# श्री ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधीदिन

**निमित्त** सेवाभावी आयुर्वेदिक तपासणी व उपचार शिबीर

- वैद्य.प्रविण पाटील.

श्री संत ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी उत्सव निमित्ताने आयुर्वेदिक सेवाभावी शिबीर आळंदी येते संपन्न

श्री संत ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी उत्सव निमित्ताने प.पु श्री सदगुरू विश्वनाथ महाराज रूकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर वतीने सेवाभावी आयुर्वेदीय तीन दिवशीय उपचार शिबिर आळंदी येते संपन्न झाले. शिबीर सोमवार , मंगळवार व बुधवार दि २५, २६ व २७ नोव्हेंबर २०२४ या तीन दिवसात, प्रसादालय भक्त निवास व श्री ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदिर श्री क्षेत्र आळंदी, या दोन ठिकानी घेण्यात आले

पहिल्या दिवसी योगी श्री निरंजन नाथ विश्वस्त श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदी यांच्या हस्ते आपल्या तीन दिवसीय सेवाभावी आळंदी शिबीराचे उदघाटन व पुजा करण्यात आली व आपल्या ट्रस्ट चा वतीने त्यांचा सत्कार वैद्य प्रविण पाटील यांनी केला तसेच पहील्या दिवसी सायंकाळी डॉ. श्री. भावार्थ रामचंद्र देखणे विश्वस्त श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, यांनी आपल्या शिबिराला सदिच्छा भेट दिली, तसेच तिसऱ्या दिवसी अँड राजेंद्रजी उमाप प्रमुख विश्वस्त श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, यांनी आपल्या शिबिराला सदिच्छा भेट दिली, दोघांचा सत्कार आपल्या ट्रस्टच्या वतीने वैद्य प्रविण पाटील यांनी केला व आपल्या ट्रस्टविषयी व सामाजिक कार्याबद्दल तसेच संपूर्ण महाराष्ट्रभर नियमित सुरु असलेल्या सेवाभावी शिबिराबद्दल त्यांना माहीती दिली

दुसऱ्यादिवसी श्री क्षेत्र पंढरपूर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरातील मुख्य शासकीय पुजारी श्री संदीप कुलकर्णी ह्यांनी आपल्या शिबिराला सदिच्छा भेट दिली, त्यावेळेस त्यांचा सत्कार वैद्य अनंत सांगडे यांनी केला

तीन दिवसीय आयुर्वेदिक सेवाभावी शिबीरात विविध कर्मासह संपूर्ण महाराष्ट्र व कर्नाटक येतील एकूण ५८३६ वारकऱ्यांनी सेवेचा लाभ घेतला त्यात प्रमुख्याने मोफत औषधी उपचार तसेच तात्काळ आराम मिळावा म्हणून निर्वात चिकित्सा, अग्नीकर्म, विद्ध कर्म असेच स्थानिक स्नेहन / अभ्यंग करण्यात आले. सर्व रुग्णांना पुढील उपचारासाठी आपल्या श्री सदगुरू विश्वनाथ महाराज रूकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर

वतीने संपूर्ण महाराष्ट्रात सुरु असलेल्या सेवाभावी आयुर्वेदीय शिबिरात रुग्णांना जेथे जवळ असेल अश्या शिबिरात पुढील उपचारासाठी बोलविण्यात आले. ह्या सेवाभावी शिबिरासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून एकूण १५७ सेवेकरिंनी सेवा दिली, यात साधारण ५७ पेक्षा जास्त वैद्य व साधारण १०० विदार्थी सेवेत सहभागी झाले. शिबिराचा समारोप पसायदान म्हणून करण्यात आला व आपल्या ट्रस्ट चा वतीने शिबिरात सेवा देणाऱ्या सर्व वैद्य व विदर्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले

श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व रिसर्च सेंटर च्या सहकार्याने वतीने असलेल्या ह्या तीन दिवशीय शिबिरात अनेक विद्यार्थी वैद्य यांनी औषधी पॅकिंग करून अनमोल सेवा दिली तसेच महाराष्ट्रतून आलेले सर्वच वैद्य व विदयार्थी तसेच श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदी या ट्रस्ट चे अनमोल सहकार्य लाभले.

पायी चालत आलेले, ८ ते १० तास दर्शनबारीत थांबलेल्या तसेच इतर जे जे उपचारासाठी आलेल्या सर्वच रुग्णांना, सद्‌गुरु कृपेने वर्षानुवर्षे आजाराने त्रासलेल्या अशा सर्वच रुग्णांना उपचार देतांना रुग्ण व वैद्याला होणारे समाधान हे अनन्या साधारण असते, याची प्रचिती सर्व सेवेकऱ्यांना आली

माऊली म्हणतात, जे जे भेटे भुतं । ते ते मानिजे भगवंत । हा भक्ती योग निश्चित जाण माझा ।। ह्या माऊलींचा ओवी प्रमाणे ह्या भक्तीचा महापुरात सेवा देतांना सर्वांनाच आनंद झाला. प पू सद्‌गुरु श्री आनंदनाथ महाराज यांचा कृपा आशीर्वादाने सेवा संपन्न झाली. सद्‌गुरुनी अशीच निष्काम सेवा दरवर्षी करून घ्यावी हिच माऊलींचा चरणी प्रार्थना.


## नम्र आवाहन
## विश्वपंढरी मासिक वर्गणी

**विश्वपंढरी मासिकाच्या ज्या वाचक सभासदांनी आपली वार्षिक वर्गणी अद्याप भरली नाही आहे त्यांनी आपली वर्गणी ट्रस्टच्या कार्यालयात भरुन सहकार्य करावे ही नम्र विनंती.**

# श्री क्षेत्र पैठण, छ.संभाजीनगर

## सेवाभावी आयुर्वेदिक तपासणी व उपचार शिबीर

- वैद्य परेश देशमुख.

श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर आयोजित व श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व रिसर्च सेंटर यांच्या सहकार्याने श्री क्षेत्र पैठण येथे ट्रस्टच्या वतीने निर्मित श्री देवनाथ महाराज समाधी मंदीर येथे सदरचे शिबीर प्रत्येक महिन्याच्या शुद्ध एकादशीस स.०९ ते संध्या. ६ या वेळेत संपन्न होते.

सदर शिबिरामध्ये दर महिन्याला येणाऱ्या रुग्णांची संख्या १०० ते १५० इतकी आहे. तर वर्षभरात १५०० ते १८०० इतके रुग्ण या शिबिराचा लाभ घेतात.

या शिवाय मार्च महिन्यात एकनाथ षष्ठी निमित्त भरवण्यात येणाऱ्या विशेष आयुर्वेदिक शिबीराचा सुमारे १५००-१८०० रुग्ण लाभ घेतात.

शिबिर प्रमुख म्हणून वैद्य वैद्य अतुल जोशी , सहवैद्य म्हणून वैद्य विजय इगडे, वैद्य. परेश देशमुखवैद्य. देवेंद्र बुणगे, वैद्य अविनाश भारती, वैद्य विकास चवरे, वैद्य दीपक खेडेकर, वैद्य चित्तरंजन रिंढे, डॉ. उदय बोंद्रे आपली सेवा देत असतात.

# श्री संत सोपान काका संजीवन समाधीदिन

## निमित्तसेवाभावी आयुर्वेदिक तपासणी व उपचार शिबीर

- वैद्य.प्रविण पाटील.

श्री संत सोपान काका संजीवन समाधी दिनानिमित्ताने श्री क्षेत्र सासवड येथे सेवाभावी शिबीर संपन्न. सदगुरू श्री विश्वनाथ महाराज रूकडीकर ट्रस्ट कोल्हापूर, संचलीत सेवाभावी आयुर्वेदीय उपचार शिबीर श्री संत सोपानकाका संजीवन समाधी दिना निमित्ताने श्री क्षेत्र सासवड येथे दि. शनिवार २८ डिसेंबर २०२४ रोजी घेण्यात आले, दर वर्षा प्रमाणे ट्रस्ट च्या वतीने मोफत आयुर्वेदीय उपचार शिबीरात सर्व वारकरी बांधवांना /भक्तांना मोफत तपासणी व उपचार करण्यात आले.

# श्री क्षेत्र सांगवडे,कोल्हापूर

## सेवाभावी आयुर्वेदिक तपासणी व उपचार शिबीर

- वैद्य. विकास महाडीक.

श्री क्षेत्र सांगवडे येथे दर महिन्याच्या चौथ्या सोमवारी (४थ्या रविवार नंतर येणारा सोमवार) या दिवशी शिबीर भरवण्यात येते.

हे शिबीर श्री लक्ष्मी नृसिंह मंदिराच्या आवारातच बरोबर समोर असणाऱ्या हॉलमध्ये होते. सांगवडे शिबीरामध्ये साधारण १५० ते २०० रुग्ण या मोफत आयुर्वेदिक औषधे व तपासणीचा लाभ घेतात. साधारण वर्षभरात साधारण २५०० पर्यंत रुग्ण हे या मोफत सेवाभावी शिबीराचा लाभ घेतात.

या शिबीराचा फायदा हा येथील स्थानिक लोकांना तसेच आजूबाजूच्या गावासहित जे गरजू, शेतकरी, गरीब अशा लोकांना झालेला आहे.

या शिबीरामध्ये आपण सांधेदुखी, गुडघेदुखी, कंबरदुखी, मानदुखी अशा मणक्याच्या आजारांबरोबर पोटाच्या तक्रारी, पित्ताच्या तक्रारी स्त्रीयांच्या पाळीच्या तक्रारी, वंधत्व तसेच लहान मूलांची वाढ कमी असणे (कुपोषित) जंत, त्याच्या खाण्याच्या तक्रारी अशा सर्व आजारांवर याठिकाणी मोफत औषधोपचार केले जातात.

तसेच आपल्या विश्ववती आयुर्वेदिक हॉस्पिटलतर्फे संधीवाताच्या रुग्णांसाठी संधीशूलहर तेल तसेच मनम याचे वाटप केले जाते.

या शिबीरामध्ये आपण जे रुग्ण वेदनेने त्रस्त आहेत अशांना लवकर आराम मिळावा यासाठी आग्निकर्म, निर्वात चिकित्सा, विद्धकर्म अशा सर्व उपचारांचा वापर करतो. त्यामुळे येथे येणारा रुग्ण नंतर वेदना दुखणे कमी झाले म्हणून समाधानाने बाहेर पडतो.

श्वास घेण्यास त्रास होणे, दमा, छातीत कफ, जुनाट सर्दी होणे अशा रुग्णांमध्ये सुद्धा आपल्या शिबीरातील माधव रसायन, रसमाधव, माधवरसायन प्लस अशी औषधे वापरुन त्यांचा १० ते १५ वर्षापासूनचा दमा कमी झालेला दिसून येतो. त्याचबरोबर या शिबीरामध्ये स्त्रीरोगांवर उपलब्ध असणाऱ्या औषधाने ज्यांना पाळीची तक्रार होती व त्यामुळे गर्भधारणा होत नव्हती अशा स्त्री रुग्णांना याचा फायदा झालेला दिसून आला व त्यांना गर्भधारणा झाली. त्यामुळे या शिबीरांमुळे ज्यांना बाहेर दवाखान्याचा खर्चिक तपासण्या व उपचार जमत नाही अशा रुग्णांना या शिबीरामुळे बरे होण्यास मदत होत आहे.

या शिबीरामध्ये स्त्री रुग्णांची येणारी संख्या जास्त आहे. कारण त्यांना नक्की विश्वास आहे की आपण या शिबीरांतील औषधांमुळे नक्की बरी होणार. त्यामुळे त्या हे शिबीर कधीच चुकवत नाहीत. आणि शिबीराला येताना आपल्या बरोबर ४ ते ५ आपल्या शेजारी- पाजाऱ्यांना आठवणीने घेऊन येतात. व आम्ही काही त्या पेशंटला समजवण्याआधीच त्या समजावून सांगतात की औषधे पाच ते सहा महिने चुकवू नकोस. म्हणजे तू बरी होशील.

आपण साधारण प्रत्येक शिबीराला ५ ते ६ हजारांची औषधांचे मोफत वाटप करतो. या शिबीराला स्थानिक गावांतील लोकांचे सहकार्य लाभते. व येथील श्री लक्ष्मी नृसिंह देवस्थान ट्रस्टचे या शिबीराला खूप सहकार्य मिळते.

सांगवडे गावातील लोक म्हणतात की, प. पू. दादा व प.पू. आनंदनाथ महाराजांमुळे आम्हाला या शिबीराचा लाभ झाला. व आम्ही सर्व वैद्यमंडळी पण या शिबीरात सेवा करुन धन्यता मानतो. या शिबीराचा शिबीर प्रमुख म्हणून मी वैद्य विकास महाडिक तसेच या शिबीराला वैद्य सागर कवारे व त्यांचे विद्यार्थी, वैद्य सुनय वाडकर, वैद्य अमित ढाणे, वैद्य रोहित पाटील, व श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालयाचा कपील सूतार हे आम्ही सर्वजण शिबीराला उपस्थित असतो.

अशीच आमच्यांकडून सेवा अखंडित करुन घेवोत हीच श्री नृसिंह व सद्गुरु चरणी प्रार्थना.



# श्री नृसिंहवाडी,कोल्हापूर

## सेवाभावी आयुर्वेदिक तपासणी व उपचार शिबीर

-वैद्य सुमित साळुंखे

श्री क्षेत्र नृसिंहवाडी येथे दर महिन्याच्या उगवत्या पौर्णिमेस आरोग्यशिबीर उत्साहात पार पडते. यावर्षी शिबीरास १३ वर्षे पूर्ण झाली. प.पू. श्री सद्‌गुरु आनंदनाथ महाराज सांगवडेकर व श्री दत्तगुरुंच्या आर्शिवादाने चालू झालेले रुग्णसेवेचे हे व्रत अविरत चालू आहे.

श्री क्षेत्र नृसिंहवाडी येथे श्री सद्‌गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट कोल्हापूर व श्री नृसिंह सरस्वती देवस्थान नृसिंहवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर घेतले जाते. राजवैद्य समीर जमदग्नी व वैद्य अनिल बनसोडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबीर चालते.

हे शिबीर धर्मशाळा हॉल, श्री दत्त मंदीराच्या पाठीमागे, नृसिंहवाडी येथे सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत चालू असते. या शिबीरामध्ये ३०० पेक्षाही अधिक रुग्णांची तपासणी केली जाती. दरवर्षी ३५०० पेक्षा ही अधिक रुग्णांची तपासणी करुन मोफत औषधे दिली जातात. अंदाजे दरवर्षी १५ लाख इतक्या रक्कमेची औषधे या शिबीरामध्ये मोफत दिली जातात.

सांगली, कोल्हापूर याबरोबरच कर्नाटक व आंध्रप्रदेश येथील गरजू रुग्णांना या शिबीराचा खूप उपयोग होत आहे. या शिबीरामध्ये संधीवात, मणक्याचे आजार, पोटाच्या तक्रारी, त्वचाविकार, स्त्रीरोग, बालरोग, मधुमेह, रक्तविकार, रक्तदोष अशा विविध आजारांवर मोफत तपासणी व औषधोपचार केले जातात. रुग्णांचा फॉलोअप ७०% पर्यंत आहे. येथे येणाऱ्या रुग्णांच्या चेहऱ्यावरचे समाधान व वेदनामुक्तीचा आनंद सर्व रुग्णानुभव येत असतात. मिरजेचे रुग्ण श्री प्रशांत चौगुले, यांना रक्तदाब व वाढते कोलेस्टेरॉल याचा त्रास होता. ॲलोपॅथीची औषधे चालू केल्यानंतर दोन महिन्यामध्ये कॉलेस्ट्रॉलचे व रक्तदाब नॉर्मल लेव्हलला आले. यामुळे आयुर्वेद चिकित्सेवरील रुग्णांचा विश्वास वाढला गेला.

बेळगावचे एक पेशंट मधुसुदन हिप्परगी यांना शुगरचा त्रास फार वाढला होता. खूप औषधोपचारानेही फारसा फरक दिसत नव्हता. शिबीरातील औषधे चालू केल्यानंतर दोन महिन्यामध्ये शुगर नॉर्मल झाली. तसेच कुरुंदवाडचे पेशंट भारती पाटील यांना मणक्यासाठी ऑपरेशन सांगितले

होते त्यांनी येथे औषधे चालू केल्यानंतर खूप सुधारणा झाली व ऑपरेशनही करावे लागले नाही. शिबीरातील औषधे ही केवळ औषधे नसून येथे रुग्ण येत असतात. त्यामुळे श्री दत्त कृपेने सर्व रुग्णांना वेदनेपासून मुक्ती मिळत असते.

आरोग्यसेवाही श्रेष्ठसेवा आहे. असे मानून येथे येणारे वैद्य सेवा देत असतात. खूप चांगल्या पद्धतीने शिबीराचे नियोजन होत असते. केस पेपर विभाग, नोंदणी विभाग, तपासणी विभाग, औषधी विभाग, विद्धकर्म विभाग, अग्निकर्म विभाग असे विभाग करुन खूप सूलभ पद्धतीने काम चालते. रुग्णांना आहार विषयक आणि पथ्य व अपथ्याचे मार्गदर्शन केले जाते.

आरोग्य शिबीर प्रमुख म्हणून वैद्य सुमित साळुंखे हे काम पाहतात. याबरोबर वैद्य प्रमोद उपाध्ये, वैद्य निलेश पाटील, वैद्य सुधाकर शिंगाडे, वैद्य मधुरा शिंगाडे, वैद्य सागर कवारे, वैद्य अजित पाटील, वैद्य महेश जंगम, वैद्य प्राजक्ता सप्रे, वैद्य सुमेधा रानडे, वैद्य संध्याराणी पाटील, वैद्य श्रीधर सुगते हे वैद्य नियमित सेवा देतात. सांगली कॉलेजचे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी ही या शिबीरामध्ये चांगला सहभाग व सहकार्य देतात.

श्री दत्तगुरुंच्या कृपेने सुरु असणारे हे आरोग्यसेवेचे व्रत नियमित आम्हा वैद्याकडून चालू राहू दे अन् ही सेवा सद्गुरु चरणी समर्पित होऊ दे. हीच आम्हा सर्व वैद्यांची श्री दत्तगुरुच्या चरणी प्रार्थना.

धन्यवाद.

‘ विश्वपंढरी ’ हे पत्र मुद्रक - श्री दिलीप गोविंदराव चौगले यांनी प्रकाशक श्री. आनंदनाथ माधवनाथ सांगवडेकर, अध्यक्ष श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट यांच्या करिता मे. आनंद ऑफसेट प्रिंटर्स, प्लॉट नं १८/२ दुधाळी, रंकाळवेश, कोल्हापूर -४१६ ०१२ ( महाराष्ट्र ) येथे छापून अध्यक्ष श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, ६१७ / ब, ‘विश्वपंढरी ’, आय.टी.पार्कसमोर, श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज मार्ग, कोल्हापूर - ४१६ ०१२ ( महाराष्ट्र )येथून प्रसिध्द केले ✻ संपादक - श्री. रामचंद्र व्यंकटेश कुलकर्णी डिक्लरेशन क्रं - DESK VII. Home. NPSR / 75 /2007

With Best Compliments From,

**Quick Heal Technologies Pvt. Ltd.**

# योग अनुभव

## योग अनुभव

- सौ. देवयानी महेश पोवार.

नमस्कार,

मी सौ. देवयानी पोवार (योगशिक्षक पदविका विद्यार्थी) रहाणार पुणे. योग शिकण्याची इच्छा पहिल्यापासूनच होती पण योग शिकण्याचा योगच येत नव्हत्ता. अखेरीस इतक्या वर्षानंतर हा योगायोग जुळून आला तो प्राजक्ता मॅडम यांच्यामुळे. त्यांच्या स्टेटूसला एकदा योगशिक्षक पदविका कोर्सबद्दल (अर्थात YCM च्या) माहिती वाचली आणि अचानक मनाने उठाव घेतला की हा कोर्स आपण करायचा. पण मनामध्ये अनेक शंका कुशंकानी थैमान घातले की शिक्षण संपवून २५ वर्षे उलटून गेली, आता जमणार का अभ्यास करणं आणि नुसता अभ्यास नाही तर प्रॅक्टीकल्स म्हणजे योगासन, प्राणायाम वगैरे म्हणजे शारिरीक आणि मानसिक स्तरावरची involvement आली. आणि दुसरे म्हणजे आपल्या रोजच्या Routine मधून आपण तेवढा वेळ देऊ शकणार का ? एखाद्या गोष्टीची इच्छा असणं हा एक भाग झाला आणि ती गोष्ट निभावणं हा दुसरा आणि जबाबदारीचा कठीण भाग झाला. या गोष्टींचे निरसन करुनच या कोर्ससाठी ॲडमिशन घ्यायची की नाही ते ठरवू असा विचार झाला आणि मी प्राजक्ता मॅडमना प्रत्यक्ष जाऊन भेटले आणि मनात जे प्रश्न होते ते विचारून घेतले. त्यांनी मला अगदी Relax केलं. तू बिनधास्त ॲडमिशन घे. आम्ही आहोतच तुला मार्गदर्शन करायला. आणि तू हे नक्की चांगल्या प्रकारे करशील. मला माझ्याबद्दल जेवढा विश्वास वाटत नव्हता तेवढा प्राजक्ता मॅडमनी माझ्यावर दाखवला. तेव्हा ठरवलं की आता हा प्रयत्न आपण करायलाच हवा. आणि मी ॲडमिशन घेतली. कोर्स तसा उशीराच चालू झाला. अगदी october च्या दुसऱ्या आठवड्यात. पुस्तकेही उशीराच हाती पडली. आणि आता अभ्यास चालू झाला. आठवड्यातून ३ लेक्चर्स आणि ३ प्रॅक्टीकल्स होत होती. ४ ते ५ शेडगे मॅडम प्रॅक्टीकल घ्यायच्या आणि ५ ते ६ प्राजक्ता मॅडम लेक्चर घ्यायच्या. दोघीही आपापल्या ठिकाणी शिकवायला उत्तम आहेत. शेडगे मॅडमनी प्रत्येक प्रॅक्टीकला आसने कशी करावी, त्यामध्ये काय करु नये हे वारंवार सांगितले. त्यांच्या प्रत्येक गोष्टीतल्या सूचना खूप clear होत्या. कोणतीही सूचना रहात नव्हती. मनापासून शिकवण्याकडे कल होता. त्यामुळे आसने करताना मानसिक ताण जाणवला नाही. किंवा आपल्याला जमेल की नाही अशी शंकाही आली नाही. आपण शिकवलेले

आपल्या प्रत्येक विद्यार्थ्याला कळले पाहिजे अशी त्यांची इच्छा होती. त्यामुळे त्याच त्या गोष्टी शेडग मॅडम न कंटाळता वारंवार सांगायच्या.

प्राजक्ता मॅडम चारही पेपर्सच Theory शिकवायच्या. विषय कोणताही असो कसाही असो तो उदाहरणे देऊन सोपा करून कसा शिकवायचा ही त्यांची हातोटी आहे. त्यांच्या शिकवण्यावरुन त्यांचे विविध विषयांचे वाचन व विविध विषयांतील ज्ञान व योगातील अनुभव नक्कीच दिसून येतो. त्यांच्यातील सकारात्मक ऊर्जेमुळे आम्हालाही परिक्षेला सामोरे जाण्याचे धैर्य मिळते आहे. त्यांच्यातील एक उत्तम योगाशिक्षक आम्हाला योगशिक्षण घेऊन त्याचा सदुपयोग करण्यासाठी प्रेरित करत आहे.

या दोन्ही योगशिक्षिकांच्या मार्गदर्शनामुळे योगशिक्षक पदविका ही परिक्षा आम्हांसर्वांना नक्कीच चांगली जाईल अशी आशा आहे.

या कोर्सच्या निमित्ताने एक उत्तम अनुभव आम्हांला मिळाला आहे. त्यासाठी मी या कोर्सची आणि योगशिक्षिकांची आभारी आहे.

## योगामुळे झालेला बदल - माझा अनुभव

सौ. वर्षा मोहिते

नमस्कार,

मी एक गृहिणी आहे आणि तीन मुलांची आई आहे. दैनंदिन जबाबदाऱ्या सांभाळताना स्वतःसाठी वेळ काढणं कठीण व्हायचं. घर, मुलं स्वयंपाक आणि इतर कामामध्य स्वतःकडे लक्ष द्यायला वेळच मिळत नसे. शरीर थकत होतं मनात कायम चिंता आणि तणाव असायचा.

योगवर्ग सुरु केल्यापासून मात्र माझ्या जीवनात मोठा बद्दल जाणवला. शरीर हलकं व लवचिक वाटू लागल. पूर्वी लहानसहान  त्रास for example पाठदुखी, डोंक दुखणं, थकवा सतत जाणवत होता. ते आता खूपच कमी झाले. श्वासोच्छवासाच्या क्रियांनी मन शांत राहू लागले. आधी जेव्हा चिडचिड व्हायची तिथे आता संयम राखता येतो.सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आत्मविश्वास वाढला दिवसांची सुरुवात योगासनांनी झाली की संपूर्ण दिवस उत्साहात जातो. मुलांच्या जबाबदाऱ्या सांभाळतानाही थकवा जाणवत नाही. केवळ व्यायाम नाही तर केवळ मन शांतीसाठी प्रभावी साधन आहे. हे मला आता समजलं आहे.

मी हा अनुभव घेतलाय म्हणून सांगू इच्छिते की, ज्यांनी योग अजून सूरु केलेला नाही त्यांनी जरूर करून बघावा. शरीर आणि मन या दोन्हीमध्ये नक्कीच सकारात्मक बद्दल जाणवतील.

# योग अनुभव

प्रीतम प्रवीण भोसले

नमस्कार,

मी  प्रीतम प्रवीण भोसले विश्वपंढरी येथे योगसाधक आहे. मी एक माझा अनुभव तुमच्या पुढे सादर करणार आहे काही चुकल्यास क्षमा असावी.

आता माझे वय ४० वर्षे,  पाच वर्षापूर्वी जेव्हा माझी दुसरी डिलिव्हरी झाली तेव्हा माझ्या ह्रदयावर त्याचा ताण आल्यामुळी माझी तब्बेत अगदीच सिरिअस झाली होती म्हणजे मी अगदी I.C.U. मध्ये पाच दिवस व्हेंटिलेटरवर होते. त्यातून मी पुर्णपणे बरी झाले. पण त्यानंतर मला डॉक्टरांनी बोलवून सांगितले की माझी जी औषधे चालु आहेत ती मी कायमच खायची आहेत अगदी मरेपर्यंत असे सांगितले. एकही गोळी चुकवायची नाही. आणि ती सगळी औषधे मी अगदी न चुकता घेत होते. त्यानंतर मी थोडे दिवसांनंतर  योगवर्ग जॉईन करायचे ठरवले तेव्हा मला असे समजले की विश्वपंढरी येथे योगवर्ग सूरु आहे. तेव्हा तेथे मी योगवर्ग सुरु केला. आता मला योग सुरु करुन २ वर्षे पूर्ण होत आहेत. माझ्या तब्बेतीमध्ये खूप फरक पडला आहे. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे माझ्या निम्म्याहून अधिक औषधे पूर्णपणे बंद झाली आहेत. डॉक्टरांनी स्वत:हून ती औषधे बंद केली आहेत. योगामुळे झालेला हा बदल माझ्यासाठी आणि कुटूंबीयांसाठी खुप महत्त्वाचा आहे. आता सगळ्यांना आर्वजून सांगते की नियमित योगा करा. आयुष्यात निरोगी राहण्यासाठी आणि दीर्घायुष्यासाठी नियमित योग करा. आता तर मी माझ्या मिस्टरांना पण योग वर्ग जॉईन करण्यास भाग पाडले आहे आणि ते पण आता सर्वांना तेच सांगतात की योग करा. विश्वपंढरीमध्ये योगवर्ग घेणाऱ्या शितल मॅडम आणि प्राजक्ता मॅडम यांची मी खूपच ऋणी आहे.

# योग अनुभव

नमस्कार,

मी विश्वपंढरी मध्ये २ वर्षे झाले विश्व योगसाधना ग्रुप जॉईन करुन. मला बीपीचा त्रास होता म्हणून मी वर्ग जॉईन केला. पण मी आता पूर्णपणे सामान्य आहे. योगमुळे खरच खुप ऊर्जावान वाटते. सकाळी वर्गाला जायला अजिबात कंटाळा येत नाही. दिवसभर एकदंम ताजे वाटते. वर्ग सोडून योग करायला नको वाटते. वर्गामध्ये पार्टनर योग, वॉल योग केल्यावर खुप छान वाटते. लाटणे योग प्रकार आहे तो तर खुप छान आहे. घरतल्यानां सुध्दा त्याचा खुप फायदा झाला. ध्यान, योग निद्रा

मुळे मन एकदम ताजं होतं. कोणत्याच गोष्टीचा कंटाळा येत नाही. योगमुळे आम्ही एकदम तरुण आहोत असे वाटते. कंटाळा आले असे तर कधीच होत नाही. सर्वात शेवटी आमच्या प्राजक्ता मॅडममुळेच हे सर्व शक्य झाले आहे.

## योग अनुभव

डॉ. सौ. प्रियांका निशांत खेबूडकर

नमस्कार,

मी डॉ. सौ. प्रियांका निशांत खेबूडकर रहाणार हडपसर, पुणे. माणसाने सतत काही तरी शिकत रहायला पाहिजे, त्यामुळे डॉक्टर झाल्यानंतर सुद्धा मी सतत वेगवेगळ्या गोष्टी शिकत असते. कधी आवड म्हणून कधी उत्सुकता म्हणून पण 'योगा'च्या बाबतीत मात्र मी चांगल्या आरोग्यासाठी त्याकडे वळले. पुण्यातच एकांकडे क्लास करताना स्वतःमध्ये कमालीचा परिणाम दिसून यायला लागला मग विचार केला इतक्या कमी वेळात इतका सुपरिणाम होत असेल, तर हे तर शिकून घ्यायलाच पाहिजे मग माझी शोधाशोध चालू झाली. कारण योग शिक्षण म्हणजे सोपी गोष्ट नव्हे. योग बद्दल आपल्याकडे प्रचंड ज्ञान उपलब्ध आहे. म्हणजे ज्ञानाचा महासागरचं, जे एका जन्मात प्राप्त करण शक्य नाही. त्यामुळं सुरुवात करायची तर पाया मजबूत हवा. त्यामुळे योग्य ज्ञान मिळवणं आवश्यक आहे. अशातच प्राजक्ता मॅडमशी बोलणं झालं आणि. YCMOU च्या योगशिक्षक पदविका अभ्यासक्रमाबद्दल माहिती मिळाली. पण मी पुण्यात आणि क्लास कोल्हापूर येथे ऑनलाईन पद्धतीने करावा लागणार होता. त्यामुळे थोडी विचारात पडले. पण प्राजक्ता मॅमनी विश्वास दिला की करता येईल फार जड जाणार नाही आणि काही असेल तरी आम्ही कायम असू. त्यामुळे ॲडमिशन घेतली. क्लास चालू झाला ऑनलाइन पण एक एक विषय प्राजक्ता मॅमनी इतका सोपा करून उलगडून सांगितला की आपोआपच आवड निर्माण व्हायला लागली. 'योग सिद्धांत', 'शिक्षणशास्त्र''शरीरशास्त्र' आणि भारतीय आहार हे चारही विषय एकामागून एक शिकवले, सगळ्या शंका कुशंका निरसन केल्या अर्थात प्राजक्ता मॅडमचा योग शास्त्राचा अभ्यास आणि अनुभव प्रचंड आहेच पण तो नवख्या व्यक्तीला सोपा करून शिकवणे हे ही अवघडच असतं पण त्यांनी ते खूप कौशल्याने करून दाखवलं. ह्या विषयांबरोबरचं आसनंही शिकवली जाणार होती. ती कशी ऑनलाइन जमणार अशी भिती वाटायला लागली. पण शितल मॅडमनी पहिलं प्रॅक्टीकल घेतलं आणि लक्षात आलं माध्यम कोणतही असो. शिकवणारे शिक्षक उत्तम असतील तर काहीच अडचण येत नाही. शितल मॅडमनी प्रत्येकाकडे

वैयक्तिक लक्ष देऊन आसनं शिकवली. अगदी श्वास कुठे घ्यायचा कुठे सोडायचा इतक्या बारकाव्यासहीत प्रत्येक आसन प्रत्येकाकडून अनेकदा करुन घेतलं. काही चुकत असेल तर परत परत करुन दाखवलं. थोडक्यात पदविका कोर्स असून दोन्ही शिक्षिकांनी त्यांच्याकडे असलेलं सगळ ज्ञान आम्हाला देण्याचा प्रयत्न केलाय. त्यामुळ ह्या कोर्सला विश्वपंढरी मध्येच ॲडमिशन घेतल हा योग्य निर्णय झाला असं वाटतय. ह्या कोर्समुळं बौध्दिक प्रगती तर झालीच पण आध्यात्मिक प्रगतीही होते आहे. आणि त्यासाठी मी सगळ श्रेय कोर्स घेणाऱ्या गुरुंना देते. आणि त्यासाठी सदैव मी त्यांची आभारी राहीन.

## योग अनुभव

मीनाक्षी पोवार पाटील

लहानपणी माझे आजोबा रोज सकाळी पाच वाजता उठून पंचगंगा नदीवर सायकलवरून पोहण्यासाठी जायचे व ते आले की सूर्यनमस्कार घालायचे. ते आम्ही सगळी लहान मुल बघायचो तेव्हा मी त्यांच्या कडून सुर्याची नावे ऐकली होती. माझ्या आजोबांची तब्येत या सूर्यनमस्कारांमुळेच खुप चांगली राहीली असे सर्वांचे म्हणणे होते. त्यांच्याकडूनच योगासनांबद्दल ऐकल होत कदाचित त्यामुळेच योगाबद्दल कुतूहल व उत्सुकता वाटत राहीली.

काही वर्षे गेली शिक्षण घेतले, नोकरी केली, लग्न झाले, मुलगी झाली, डिलिव्हरी मध्ये पुन्हा योगची आठवण झाली, त्यावेळी घरातून बाहेर जाऊ शकत नव्हते, पुस्तके वाचून थोड योग करायला सुरुवात केली, पण पुस्कांमधून मिळालेल्या माहितीनुसार प्रॅक्टिकल योग्य पद्धतीने होत आहे की नाही हे कळायला मार्ग नव्हता म्हणून काही महिन्यातच जवळ असलेले योग क्लासेस शोधून तिथे जाऊ लागले. खूप तृटी जाणवायच्या जस की योग विषयक कमी ज्ञान असलेले शिक्षक क्लासेस घ्यायचे. सावधानता सांगितल्या नसल्याने काही लोकांना शारीरिक इजा व्हायची त्यामुळे आसनांचे फायदे न होता नुकसान व्हायचे व लोकांचा विश्वास उडायचा. या कारणांमुळे योग स्वत: शिकून दुसऱ्यांनाही शिकवता आले तर असा विचार मनात येऊ लागला.

घरगुती कारणांमुळे तणाव वाढत असायचा त्यातच भरीला कोरोना आला त्या काळात तर ताणतणाव खूप वाढले. अनेक जवळची लोक कोरोनाला बळी पडली त्याचा वेगळाच परिणाम माझ्या मानसिकतेवर झाला आणि त्याचे परिणाम फार गंभीर दिसू लागले काही काळानंतर मी पुन्हा योग शिकण्याचा प्रयत्न करू लागले.

मग मी योगशिक्षक होण्यासाठी योगशिक्षक कोर्सेसची माहिती घ्यायला सुरुवात केली बरीच चौकशी केल्यानंतर श्री विश्वती आयुर्वेदिक हॉस्पिटल मध्ये चालणाऱ्या 'योगशिक्षक' च्या कोर्सची माहिती मिळाली. कोर्सला ऍडमिशन घेतले आणि योग्य पद्धतीने योग शिकायला सुरुवात झाली. विश्वपंढरी मार्फत शिकवला जाणारा YCM चा योगशिक्षक पदविका हा अभ्यासक्रम शिकवण्यासाठी असलेल्या शिक्षिका प्राजक्ता कुलकर्णी आणि शितल मॅम यांच्या सुयोग्य मार्गदर्शनाखाली आमचे प्रॅक्टिकल्स व लेक्चर्स होत गेले आणि मला खूप चांगले मार्गदर्शन मिळत गेले.

योगासन केल्यामुळे माझ्यात शारीरिक व मानसिक बदल झाले. पूर्वी सारखं अंग दुखल्यासारखं वाटायचं नव्हे दुखायचं पायऱ्या चढताना लगेच थकवा जाणवायचा पिंडऱ्यांचे मसल आखडल्यामुळे पाऊल पुढे पडायचं नाही. वजन खूप वाढत होतं. वात वाढल्यामुळे शरीरावर सूज, फुग होती शरीर जड वाटायचे.

योगासने नियमित करायला लागल्यापासून अंग दुखायचे कमी होत बंद झाले. सांधे मोकळे झाले त्यामुळे जी कामे मी करू शकत नव्हते ती करू लागले. वजन १० ते १२ किलोने कमी झाले. शरीरातील वात कमी झाल्यामुळे सूज, फुग ही कमी झाली. शरीर सुडौल झाले. आहारशास्त्रामध्ये शिकवल्याप्रमाणे आहार व दिनचर्येचा अवलंब केल्यामुळे पचनाचे आजार कमी होऊन पित्त व कफ यांचाही समतोल साधला. शरीर हलके वाटू लागले. पाठीचा कणा, रिप्रॉडक्टिव्ह सिस्टीम, श्वसन संस्था यांच्यावरही आसनांमुळे सुपरिणाम दिसू लागले. हे सर्व परिणाम दिसून येईपर्यंत मी माझ्या शरीरावर अतिरिक्त ताण देऊन हे सर्व करत आहे असे कधीही वाटले नाही खूप सहजतेने योग करता येत होता.

योगासनांमुळे माझ्या मानसिकतेतही बदल झाले. यापूर्वी माझी दिनचर्या ही ठरलेली नसायची जेवणाच्या वेळाही वेगवेगळ्या असायच्या आहारशास्त्र, शरीरशास्त्र, योगसिद्धांत व शिक्षण शास्त्र हे विषय या योगशिक्षक पदविका कोर्सच्या निमित्ताने शिकताना मला दिनचर्या कशी असावी आहार कसा असावा समाजात वावरताना यम-नियम कसे पाळावे, योग विषयक इतिहास, त्याचा आपल्या रोजच्या आयुष्यात दिनचर्येत कसा समावेश करावा व हे सर्व केल्यामुळे आपल्या शरीररचनेवर कसे चांगले परिणाम होतात हे शिकायला मिळाले. त्या सर्वांमुळे माझ्या विचारसरणीतही बदल मला जाणवले व या शरीराचे महत्त्व व त्यापासून अध्यात्मिक प्रगती कडे वाटचाल कशी करता येईल हेही समजले.

अशाप्रकारे योगशिक्षक कोर्सला प्रवेश घेतल्यामुळे माझ्या आयुष्याला एक चांगले वळण लागले आहे. त्यासाठी मी विश्वपंढरी व माझ्या शिक्षिका प्राजक्ता कुलकर्णी यांचे मनापासून आभार मानते .

# श्री विश्वसाधना

## आयुर्वेदिक चिकित्सालय व पंचकर्म केंद्र

### वैद्य जय ताम्हाणे

शॉप नं. ९ व १०,हेरिटेज प्लाझा, पिंपरी-चिंचवड लिंक रोड,
चिंचवड, पुणे. ३३. मोबाईल क्रः ९८२२६२६५१५


धूतपापेश्वर
आयुर्वेद श्रेष्ठतेची १५० हून अधिक वर्षे
१५० वर्षांहून अधिक
अम्लपित्त मिश्रण®
सस्पेंशन
अम्लपित्तापासून त्वरित आणि
दीर्घकाळ उपशय।
२०० मि.लि.,
४५० मि.लि.
© February 2025, Shree Dhootapapeshwar Limited
उपयुक्तता
◆ भूक न लागणे ◆ आंबट ढेकर येणे
◆ मळमळणे ◆ पोट दुखणे ◆ छातीत जळजळणे
या अम्लपित्ताच्या लक्षणांपासून आराम
मात्रा:
१५ मि.लि. दिवसातून २ ते ३ वेळा जेवणापूर्वी.
केवळ नोंदणीकृत चिकित्सक, रुग्णालय किंवा प्रयोगशाळां करिता
Authentic · Standardised · Safe · Efficacious
Shree Dhootapapeshwar Standards
SDS Monograph No. 070003
Amlapitta Mishran Suspension
श्री धूतपापेश्वर लिमिटेड
शास्त्रोक्त, मानकीकृत, सुरक्षित व उत्तम गुणवत्तेच्या आयुर्वेद औषधांचे निर्माते
१३५, नानुभाई देसाई रोड, खेतवाडी, मुंबई -४०० ००४.
फोन नं.:+९१-२२-६२३४ ६३००/२३८२ ५८८८;
विक्रम
Toll Free : 1-800-2 AYUSH
(Dial AYUSH as in 29874
working days 9:00-17:00 hrs)
SDL/VR/Vishwapandhari/T/0225
E-mail : healthcare@sdlindia.com • www.sdlindia.com

वर्ष १९ वे | अंक ०४ था | ०१ एप्रिल २०२५ | पाने ८० | वार्षिक मूल्य रु.३००/-




धूतपापेश्वर
आयुर्वेद श्रेष्ठतेची १५० हून अधिक वर्षे
१५० वर्षांहून अधिक

# ब्राह्मी वटी बुद्धिवर्धक

आयुर्वेद सार संग्रह

## मस्तिष्कगत विकारांमध्ये लाभदायी कल्प

### उपयुक्तता

- निद्रानाश
- मानसिक ताण
- स्मरणशक्ति कमी होणे
- मानसिक दुर्बलता




### मात्रा आणि अनुपान

१ ते २ गोळ्या दिवसातून २ वेळा सारस्वतारिष्ट, दशमूलारिष्ट किंवा चिकित्सकाच्या सल्ल्यानुसार

### उपलब्धता

१० गोळ्या, ३० गोळ्या, ३०० गोळ्या

Authentic · Standardised · Safe · Efficacious
Shree Dhootapapeshwar Standards
SDS Monograph No. 0500564
Brahmi Vati Buddhivardhak

केवळ पंजीकृत चिकित्सक, हॉस्पिटल व प्रयोगशाळांसाठी © All Copy Rights Reserved

शास्त्रोक्त, मानकीकृत, सुरक्षित व उत्तम गुणवत्तेच्या आयुर्वेद औषधांचे निर्माते

**श्री धूतपापेश्वर लिमिटेड**
१३५, नानुभाई देसाई रोड, खेतवाडी, मुंबई -४०० ००४.
फोन नं.:+९१-२२-६२३४ ६३००/२३८२ ५८८८

Toll Free : 1-800-2 AYUSH
(Dial AYUSH as in 29874
working days 9:00-17:00 hrs)

SDL/VT/Vishwapandhari/S/1224

E-mail : healthcare@sdlindia.com • www.sdlindia.com


प्रेषक – श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर
पत्ता -'विश्वपंढरी', श्री सद्गुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर मार्ग, मंगळवार पेठ, कोल्हापूर- ४१६०१२- फोन -०२३१-२६२००४४